CMYK

सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. १२ जुलै २०२६ | वर्ष - ४ थे | अंक ८९ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## धावत्या रेल्वेतील प्रवाशांनी चोराला नेले लटकावून

पटना : धावत्या रेल्वेच्या खिडकीतून मोबाईल चोरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका चोराला प्रवाशांनी पकडून ट्रेनच्या बाहेर लटकलेल्या अवस्थेत पुढील स्थानकापर्यंत नेल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.मानसी ते खगडिया या प्रवासादरम्यान घडलेली ही घटना सध्या प्रशासन आणि कायदेशीर वर्तुळात चर्चेचा विषय ठरली आहे.बिहारमधील बरौनी-कटिहार रेल्वेमार्गावरील मानसी स्थानकावर एका तरुणाने जनहित एक्स्प्रेसच्या खिडकीतून प्रवाशाचा मोबाईल हिसकावण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्याचा हा प्रयत्न त्यालाच महागात पडला. मोबाईल खेचण्याचा प्रयत्न होताच डब्यातील प्रवासी सतर्क झाले आणि त्यांनी त्या तरुणाला पकडले.डब्यातील अनेक प्रवाशांनी खिडकीतून त्याचा एक हात घट्ट पकडून ठेवला. तो स्वतःची सुटका करण्याचा प्रयत्न करत होता, मात्र प्रवाशांनी त्याची पकड सोडली नाही. परिणामी, मानसी स्थानकापासून खगडिया स्थानकापर्यंत तो ट्रेनच्या बाहेर लटकलेल्या अवस्थेतच प्रवास करत राहिला.

## नोकरीसाठी खून

जयपूर : जयपूरमधील लॉ स्टुडंटला तिच्या आईची सरकारी नोकरी आपल्याला मिळावी म्हणून आईचा खून केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे. जयपूरमधील २३ वर्षाच्या आयुषी शर्माने तिची आई नीरज शर्माचा सुपारी देऊन खून केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी तिला अटक देखील केली आहे. आता या प्रकरणाला वेगळं वळण लागलं असून आयुषीने आपल्या वडिलांचा देखील अशाच प्रकारे काटा काढला असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. आयुषीच्या मामांनी आयुषीने गेल्या वर्षी तिच्या वडिलांचा देखील खून केला असावा असा आरोप केला आहे. जयपूर कोर्टात क्लार्क म्हणून काम करणाऱ्या विजय शर्मा यांच्या मृत्यूनंतर त्यांची पत्नी नीरज शर्मा यांना अनुकंपा तत्वावर सरकारी नोकरी लागली होती. विजय शर्मा यांचा गेल्या वर्षी दीर्घ आजारामुळं मृत्यू झाला होता.

## ईडीची कारवाई

मुंबई : अभिनेता शेखर सुमन यांच्याशी संबंधित मुंबईतील एका चित्रपट निर्मात्याविरुद्ध अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) परकीय चलन व्यवस्थापन कायद्यांतर्गत चौकशी सुरू केली आहे.परदेशातील अघोषित मालमत्ता, विदेशी बँक खाती आणि परकीय चलन व्यवहारांमधील कथित अनियमिततेप्रकरणी ईडीने मुंबईतील विविध ठिकाणी छापे टाकत महत्त्वाचे पुरावे जप्त केल्याचा दावा केला आहे.ईडीने गुरुवारी कलानी इम्पेक्स लिमिटेड आणि कंपनीचे संचालक धर्मेश संगानी, त्यांची पत्नी रंजिता संगानी व नरेंद्र संगानी यांच्याशी संबंधित ठिकाणांवर छापे टाकले. धर्मेश संगानी हे शेखर सुमन यांनी सुरू केलेल्या एका फिल्म अकादमीचे सह-संस्थापक आहेत. सध्या ही चौकशी केवळ संगानी कुटुंबीय आणि त्यांच्या कंपनीपुरतीच मर्यादित असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

## आज मेगाब्लॉक !

मुंबई : विविध अभियांत्रिकी आणि देखभालीसाठी मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाने रविवारी (१२ जुलै) रोजी उपनगरीय मार्गांवर मेगाब्लॉक घेतला आहे. हा ब्लॉक मुख्य मार्गिकेवर छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस आणि विद्याविहार तसेच चुनाभट्टी/वांद्रे (अप आणि डाऊन) मार्गिकेवर सकाळी १०.५५ ते दुपारी १५.५५ वाजेपर्यंत आहे.मुंबई येथून सुटणाऱ्या धीम्या मार्गावरील गाड्या सीएसएमटी ते विद्याविहार स्थानकांदरम्यान डाऊन जलद मार्गावर वळवल्या जाणार आहेत. या गाड्या भायखळा, परळ, दादर, माटुंगा, शीव आणि कुर्ला स्थानकांवर थांबणार आहेत

# राज्यावरील कर्जाचा बोजा वाढला

## कॅगच्या अहवालातून उघड; जलजीवन मिशनच्या कामांमधील त्रुटींवरही बोट

तभा वृत्तसेवा

मुंबई : विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी सभागृहात सादर करण्यात आलेल्या कॅगच्या (भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक) अहवालाने महाराष्ट्राच्या आर्थिक स्थितीबाबत अत्यंत चिंताजनक चित्र समोर आणले आहे. राज्याचा महसुली तुटीचा आलेख उंचावला असून, महाराष्ट्रावरील एकूण कर्जाचा बोजा आता तब्बल ८.८७ लाख कोटी रुपयांवर पोहोचला आहे. हा कर्जभार राज्याच्या सकल राज्य उत्पन्नाच्या (जीएसडीपी) १९.५८ टक्के इतका आहे. एकीकडे राज्यावरील कर्जाचा डोंगर वाढत असतानाच, दुसरीकडे केंद्र सरकारच्या अत्यंत महत्त्वाकांक्षी अशा 'जलजीवन मिशन' योजनेच्या राज्यातील अंमलबजावणीमध्ये नियोजन, वित्तीय व्यवस्थापन आणि प्रत्यक्ष कामाच्या पातळीवर गंभीर स्वरूपाच्या त्रुटी




असल्याचे 'कॅग'ने अहवालात नमूद केले आहे.'कॅग'च्या अहवालानुसार, आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये महाराष्ट्राच्या स्थूल राज्य उत्पन्नात ११.७३ टक्के आणि महसुली प्राप्तीमध्ये ११.९२ टक्क्यांची वाढ झाली असली, तरी खर्चाचा ताळमेळ न बसल्याने आर्थिक शिस्तीला मोठा फटका बसला आहे. राज्याची महसुली तूट २९ हजार ९९४.७६ कोटी रुपयांवर, तर वित्तीय तूट १ लाख २४ हजार २०८ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. तसेच प्राथमिक तूट ७० हजार ७५३.६३ कोटी रुपये नोंदवली गेली आहे. धक्कादायक बाब म्हणजे, अर्थसंकल्पात मंजूर करण्यात आलेल्या २९७ अनुदानांपैकी तब्बल १.६८ लाख कोटी रुपये खर्चच केले गेलेले नाहीत, तर दुसरीकडे ७६३.०५ कोटी रुपयांचा अतिरिक्त खर्च नियमितीकरणाच्या (रेगुलरायझेशन) प्रतीक्षेत प्रलंबित आहे. याच वेळी, स्थानिक स्वराज्य संस्थांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी सहाव्या राज्य वित्त आयोगाच्या अहवालात करण्यात आलेल्या शिफारशींनुसार, सर्व २९ महानगरपालिकांना शहरी पायाभूत सुविधांसाठी निधी उभारण्याकरिता स्वतःचे क्रेडिट असेसमेंट करणे बंधनकारक करण्यात आले असून मार्च २०३० पर्यंत बाजारात किमान एक तरी 'म्युनिसिपल बाँड' जारी करण्याची कायदेशीर सक्ती करण्यात आली आहे.त्याशिवाय राज्यातील 'जलजीवन मिशन' अंतर्गत पिण्याच्या पाण्याच्या योजनेत गाव, जिल्हा आणि राज्य पातळीवरील यंत्रणांमधील त्रुटींमुळे केंद्राच्या या कार्यक्रमाला मोठा खिळ बसल्याचे 'कॅग'ने म्हटले आहे. हिंगोली, जालना, पालघर, बीड, धुळे आणि परभणी या सहा जिल्ह्यांच्या विशेष तपासणीत असे दिसून आले की, महाराष्ट्रात हे मिशन यशस्वी करण्यासाठी केलेले सुरुवातीचे नियोजनच अत्यंत कमकुवत होते. तपासणी केलेल्या कोणत्याही जिल्ह्याने आवश्यक असलेला 'बेसलाईन सर्व्हे' केला नव्हता. निवडलेल्या २४ गावांपैकी ज्या गावांसाठी 'विलेज क्शन प्लॅन' तयार करण्यात आले, त्यातील १३ 'विलेज वॉटर अँड सॅनिटेशन कमिट्या' तर चक्क ग्रामपंचायतींना कोणतीही पूर्वकल्पना किंवा माहिती न देता स्थापन करण्यात आल्या होत्या. जिल्हा क्शन प्लॅनमध्येही मिशनच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार आवश्यक असलेल्या घटकांचा समावेश नव्हता.

# ग्रामपंचायतींची ७०० कोटींची वीज बिले थकली

मुंबई :राज्यात सध्या प्रशासकांच्या ताब्यात असलेल्या सुमारे १४ हजार ग्रामपंचायतींची तब्बल ७०० कोटी रुपयांची वीज बिले थकली असल्याची माहिती समोर आली आहे. राज्य शासनानेच गावपातळीवरील आर्थिक स्थितीचा आढावा घेण्यासाठी मागविलेल्या आकडेवारीतून हे उघड झाले असून, प्रशासक म्हणून काम पाहणाऱ्या माजी सरपंचांच्या आर्थिक अधिकारांवर कायदेशीर मर्यादा आल्याने गावपातळीवरील दैनंदिन कामकाजावर आणि अत्यावश्यक सेवांवर याचा अत्यंत गंभीर परिणाम होत आहे. ही बिकट परिस्थिती सावरण्यासाठी आता राज्य शासनाने या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करावा आणि प्रशासकांना आवश्यक ते आर्थिक अधिकार बहाल करावेत, अशी मागणी ग्रामीण भागातून जोर धरू लागली आहे.राज्यातील मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींचा कारभार सुरळीत चालवण्यासाठी सरकारने माजी सरपंच आणि सदस्यांच्या प्रशासकीय समित्यांची नियुक्ती केली होती. मात्र, सरकारच्या या धोरणात्मक निर्णयाविरोधात न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्यानंतर, न्यायालयाने प्रशासकांच्या आर्थिक अधिकारांवर मोठ्या मर्यादा आणल्या. सध्याच्या कायदेशीर चौकटीत या प्रशासकांना केवळ ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे वेतन आणि अतिअत्यावश्यक खर्चालाच मंजुरी देण्याची मुभा उरली आहे, तर इतर सर्व प्रकारच्या विकासकामांच्या देयकांवर कठोर निर्बंध लादण्यात आले आहेत. परिणामी, वीज बिलांची रक्कम ७०० कोटींच्या घरात पोहोचली असून प्रशासकीय कोंडीमुळे ती अदा करणे कठीण झाले आहे.या आर्थिक निर्बंधांचा फटका गावपातळीवरील विविध विकासकामांना बसत असून ग्रामीण अर्थचक्र मंदावले आहे. राज्यभरातील स्थानिक पुरवठादार, लहान-मोठे कंत्राटदार आणि ग्रामपंचायतींना सेवा देणाऱ्या संस्थांची जुनी देयके रखडल्याने त्यांच्यावर आर्थिक संकट ओढवले आहे.

# विधान परिषदेत विरोधकांचे संख्याबळ घटणार

तभा वृत्तसेवा

मुंबई : राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचे शुक्रवारी सूप वाजले असतानाच, आगामी हिवाळी अधिवेशनाआधी विरोधकांना आणखी एक धक्का बसणार आहे. विधान परिषदेतील ५ आमदारांचा कार्यकाळ येत्या ६ डिसेंबर रोजी संपणार असून, ७ डिसेंबरपासून नागपुरात सुरू होणाऱ्या हिवाळी अधिवेशनापूर्वीच हे आमदार निवृत्त होणार आहेत. त्यामुळे पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी या सदस्यांनासभागृहात निरोप देण्यात आला.या ५ आमदारांपैकी ४ सदस्य विरोधी पक्षांचे असल्याने आगामी काळात वरिष्ठ सभागृहातील विरोधकांची ताकद कमी होणार असून, रिक्त होणाऱ्या या जागांसाठी नोव्हेंबर महिन्यात संभाव्य असलेल्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीकडे आता संपूर्ण राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.हिवाळी अधिवेशनापूर्वी निवृत्त होणाऱ्या सदस्यांमध्ये विरोधी बाकांवरील



४ आणि सत्ताधारी बाकांवरील (सहयोगी) १ अशा पाच आमदारांचा समावेश आहे. यामध्येछत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार सतीश चव्हाण, पुणे पदवीधर मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) आमदार अरुण लाड, आणि नागपूर पदवीधर मतदारसंघातून काँग्रेसचे आमदार अभिजित वंजारी या तीन बड्या नेत्यांची मुदत संपत आहे. त्यांच्या जोडीलाच पुणे विभाग शिक्षक मतदारसंघातील काँग्रेसचे आमदार जयंत आसगावकर आणि अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघातील अपक्ष आमदार किरण सरनाईक हे देखील निवृत्त होत आहेत. या पाचही सदस्यांनी आपल्या कार्यकाळात विधान परिषदेत शिक्षण, सहकार, शेती आणि विविध सामाजिक प्रश्नांवर अत्यंत अभ्यासपूर्ण मांडणी करत सभागृहाचा दर्जा उंचावला होता.निवृत्त होणारे अपक्ष आमदार किरण सरनाईक यांनी यापूर्वीचउपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेयांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे सहयोगी सदस्य होण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आगामी अमरावती शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत महायुतीच्या मदतीने त्यांच्या विजयाचा मार्ग अधिक सुकर झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. ६ डिसेंबरला या पाच जणांची मुदत संपणार असल्याने आणि ७ डिसेंबरपासूननागपुरात हिवाळी अधिवेशनसुरू होणार असल्याने, केंद्रीय निवडणूक आयोग साधारणतः नोव्हेंबर महिन्यातच या पाच जागांसाठी निवडणुकीची घोषणा करण्याची दाट शक्यता आहे.

# व्हिएतनाममध्ये भारतीय पर्यटकांची बोट उलटली;

## १५ जणांचा करुण अंत, उंच उसळणाऱ्या लाटांमुळे घात?

वृत्तसंस्था



हनोई : व्हिएतनामच्या फू क्वोक बेटाजवळ शनिवारी भारतीय पर्यटकांना घेऊन जाणारी बोट समुद्रात उलटली. या भीषण दुर्घटनेत १५ भारतीयांचा मृत्यू झाला आहे. तर २१ जणांना सुरक्षित वाचवण्यात यश आलं आहे. अपघातानंतर स्थानिक प्रशासनानं तातडीनं मदत आणि बचाव कार्य सुरू केलं. सध्या भारतीय दूतावास संपूर्ण घटनाक्रमावर लक्ष ठेवून आहे. स्थानिक अधिकाऱ्यांच्या संपर्कात आहे. दुर्घटनेचा फटका बसलेल्या कुटुंबांच्या मदतीसाठी हो ची मिन्ह शहर सिटी आणि हनोईत आपत्कालीन केंद्र तयार करण्यात आलं आहे. रॉयटर्स वृत्तसंस्थेनं दिलेल्या माहितीनुसार, दुर्घटनाग्रस्त बोटीत एकूण ३६ जण होते. यात ३२ भारतीय पर्यटक, ३ क्रू मेंबर आणि १ अटेंडंटचा समावेश होता. दुर्घटनेत १५ भारतीय पर्यटकांचा मृत्यू झाला असून २१ जणांना वाचवण्यात यश आलेलं आहे.स्थानिक अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, दुर्घटनाग्रस्त झालेली बोट बंदराच्या दिशेनं परतत होती. त्यावेळी किनाऱ्यापासून ४०० मीटर दूरवर समुद्रात बोट उलटली. त्यावेळी समुद्रात उंच लाटा उसळत होत्या. याच कारणामुळे अपघात झाला. अपघातामागील नेमक्या कारणांचा शोध अद्याप सुरू आहे. फू क्वोक व्हिएतनाममधील सर्वात मोठं बेट आहे. गेल्या काही वर्षांमध्ये या बेटावर भारतीय पर्यटकांची गर्दी वाढू लागली आहे. हे बेट भारतीय पर्यटकांमध्ये विशेष लोकप्रिय आहे. त्यामुळे या ठिकाणी मोठ्या संख्येनं भारतीय पर्यटक सुट्ट्या घालवण्यासाठी येतात.अपघाताची माहिती मिळताच व्हिएतनाममधील भारतीय दूतावासानं सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर एक पोस्ट शेअर केली. 'एक अतिशय दु:खद घटना घडली आहे. काही तासांपूर्वी व्हिएतनामच्या फू क्वोक बेटाजवळ अनेक भारतीय पर्यटकांना घेऊन जाणारी बोट उलटली. अपघातामागील नेमक्या कारणांचा शोध घेतला जात आहे. स्थानिक अधिकाऱ्यांकडून शोध मोहीम राबवली जात आहे. बचाव अभियान सुरू आहे,' अशी माहिती व्हिएतनाममधील भारतीय दूतावासाकडून देण्यात आली.बोट उलटताच स्थानिक प्रशासनानं तातडीनं मदत कार्य सुरू केलं. पाण्यात बुडणाऱ्यांची सुरक्षित सुटका करण्यासाठी बचाव पथकांनी धाव घेतली. सध्याच्या घडीला मदत कार्य पूर्ण वेगात सुरू आहे. बचाव अभियान पूर्ण करण्याला प्राधान्य देण्यात आलं असून त्याच सुमारास पीडितांना सर्वेतोपरी मदत दिली जात आहे.

## वेश्या व्यवसायाचा पर्दाफाश

कोपरखैरणे : नवी मुंबई पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने पनवेल शहरातील एका लॉजवर छापा टाकून वेश्या व्यवसायाचा पर्दाफाश केला.

या कारवाईत दोन बांगलादेशी महिलांसह एकूण सहा पीडित महिलांची सुटका करण्यात आली. या कारवाईत लॉज व्यवस्थापक, कॅशिअर व वेटर यांना अटक करण्यात आली असून फरार लॉज मालकाचा शोध सुरू आहे.पनवेल येथील हॉटेल राहुल पार्क, फॅमिली रेस्टॉरंट, गार्डन बार, लॉजिंग अँड बोर्डिंग येथे महिलांना ठेवून वेश्या व्यवसाय चालविला जात असल्याची गुप्त माहिती ८ जुलै रोजी पोलिसांना मिळाली होती.त्यानुसार पोलिसांनी बनावट ग्राहक पाठवून माहितीची खातरजमा केली. ग्राहकाने संकेत दिल्यानंतर अनैतिक मानवी प्रतिबंध कक्षाच्या पथकाने लॉजवर छापा टाकला.




# निता अंबानी 'मोस्ट पॉवरफुल वुमन' यांचे 'विकसित भारत'चे स्वप्न



'फॉर्च्युन इंडिया'ने शुक्रवारी मुंबईतील 'फोर सीझन्स हॉटेल'मध्ये आपला प्रमुख कार्यक्रम 'मोस्ट पॉवरफुल वुमन' (MPW) २०२६ आयोजित केला. या कार्यक्रमात व्यवसाय, वित्त, तंत्रज्ञान, आरोग्यसेवा, सार्वजनिक धोरण आणि उद्योजकता या क्षेत्रांतील भारतातील आघाडीच्या महिला नेत्या एकत्र आल्या होत्या.

या कार्यक्रमात 'फॉर्च्युन इंडिया मोस्ट पॉवरफुल वुमन २०२६' ही यादी जाहीर करण्यात आली; या यादीद्वारे अशा १०० महिलांचा गौरव करण्यात आला, ज्यांचे नेतृत्व देशाचे आर्थिक आणि व्यावसायिक क्षेत्र घडवत आहे. या संध्याकाळी नेतृत्व, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), आर्थिक सक्षमीकरण, उद्योजकता, सर्वसमावेशकता आणि राष्ट्रनिर्मिती या विषयांवर अत्यंत प्रभावी चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले होते. महत्त्वाच्या क्षणांपैकी एक म्हणजे, रिलायन्स फाऊंडेशनच्या अध्यक्षा आणि या वर्षी 'सर्वात प्रभावशाली महिलां'च्या यादीत प्रथम क्रमांकावर असलेल्या नीता अंबानी यांनी करुणा, सर्वसमावेशकता आणि संधी यांवर आधारित नेतृत्वाच्या व्यापक व्याख्येचा पुरस्कार केला; तसेच, मुलींच्या विकासासाठी गुंतवणूक करणे हे भारताच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.




विविध सत्रांमधील व्यावसायिक नेत्यांनी यावर भर दिला की, जरी एआय, भू-राजकीय बदल आणि वेगवान तांत्रिक बदल उद्योगांमध्ये परिवर्तन घडवत असले तरी, चिरस्थायी नेतृत्व हे जिज्ञासा, लवचीकता, ग्राहक-केंद्रितता आणि मानवी निर्णयक्षमतेवरच अवलंबून राहील. आर्थिक समावेशनाबाबतच्या चर्चांमधून हे अधोरेखित झाले की, महिला सक्षमीकरणाचा पुढील टप्पा केवळ आर्थिक सेवांच्या उपलब्धतेपुरता मर्यादित नसून, तो सक्रियपणे संपत्ती निर्मिती आणि आर्थिक निर्णयप्रक्रियेत सहभागी होण्यामध्ये सामावलेला आहे.

या कार्यक्रमात सर्वसमावेशक कार्यस्थळे उभारणे, ग्राहकांच्या पसंतीस उतरणारे आणि दीर्घकाळ टिकणारे ब्रँड्स निर्माण करणे, तसेच 'विकसित भारत'चे स्वप्न साकारण्यात पोषण आणि आरोग्यसेवेची भूमिका या विषयांवरही सखोल चर्चा करण्यात आली. नेतृत्वासाठी भारतातील सर्वात प्रभावशाली मंचांपैकी एक म्हणून 'मोस्ट पॉवरफुल वुमन' आवृत्तीने व्यवसाय आणि समाज या क्षेत्रांत महत्त्वपूर्ण प्रभाव पाडणाऱ्या महिलांचा गौरव करण्याच्या 'फॉर्च्युन इंडिया'च्या कटिबद्धतेवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब केले.

advt

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### हरिभाई देवकरण प्रशालेत पालक शिक्षक सभा

**सोलापूर, दि. ११ जुलै-**

शाळा समिती अध्यक्ष सुरेशबाबु मंकणी यांच्या मार्गदर्शनाखाली पालक सभा संपन्न झाली. पालक सभेचे प्रास्ताविक जेष्ठ पर्यवेक्षक औदुंबर सर्वगोड यांनी केले. यावेळी पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष चैतन्य कांबळे उपस्थित होते. यावेळी पालकांनी मनोगते व्यक्त केली.इयत्ता ५ वी ते १० वीच्या माता व पिता पालक कार्यकारिणी सदस्य निवड करण्यात आली. मुख्याध्यापिका स्मिता कांगुणे यांनी पालकांनी शाळेच्या नेहमी संपर्कात रहावे तसेच विद्यार्थी सुजाण नागरिक बनावा अशी अपेक्षा सांगितली. प्रशालेत विविध शाला बाह्य परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा, क्रीडा स्पर्धा बाबतची माहिती बडवे, पिल्ले, घंटे व साळसकर यांनी दिली. सूत्रसंचालन मंजिरी हरहरे तर आभार उपमुख्याध्यापक रविंद्र पानसरे यांनी मानले.



### गौंडरेचे शिक्षक सांगडे, रणमोडे यांचा सेवापूर्ती निमित्त सत्कार

**जेऊर, दि. ११ जुलै-**

डॉ. हेडगेवार माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक गौतम सांगडे आणि सहशिक्षक दिलीप श्रीरंगमोडे यांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवापूर्तीचा सत्कार सोहळा गौंडरे फाटा येथील साईप्रेम मंगल कार्यालयात संपन्न झाला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माजी शिक्षक आमदार तथा शिक्षक नेते प्रा. दत्तात्रय सावंत उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशकल्याणी ग्रामीण सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. गणेशराव करे-पाटील होते. यावेळी करमाळा तालुक्याच्या वतीने आणि यशकल्याणी ग्रामीण सेवाभावी संस्थेकडून सांगडे व रणमोडे यांना मानपत्र प्रदान करून गौरविण्यात आले. करे-पाटील यांनी दोन्ही शिक्षकांच्या प्रदीर्घ, प्रामाणिक आणि विद्यार्थिनिष्ठ सेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त करत त्यांच्या कार्याचा गौरव केला. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष अरविंद श्रीरंग रणमोडे, उपाध्यक्ष दत्तात्रय अजिनाथ कापले, सचिव दिनकर विष्णू सांगडे, संचालक महादेव भागवत गायकवाड, पोपट अजिनाथ कापले, अर्जुन शंकर ननवरे आणि रामकृष्ण बाबुराव खंडागळे उपस्थित होते.




### पिसेवाडीत कृषीकन्यांकडून मोफत लंपी लसीकरण मोहीम

**वेळापूर, दि. ११ जुलै-**

महात्मा फुले कृषी विद्यापीठ (राहुरी) संलग्नित रत्नाई कृषी महाविद्यालय, अकलूज अंतर्गत ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमात कार्यरत कृषीकन्यांनी पिसेवाडी (ता. माळिशरस, जि. सोलापूर) येथे गाई-म्हशींमध्ये होणाऱ्या 'लंपी स्कीन डिसीज' रोगाविषयी जनजागृती मोहीम आणि मोफत लसीकरण अभियानाचे यशस्वी आयोजन केले.

या कार्यक्रमाप्रसंगी पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. महेश वाघमोडे यांनी लंपी रोग आणि एफएमडी (लाळखुरकत) यांसारख्या विविध घातक रोगांबद्दल माहिती दिली. या उपक्रमासाठी रत्नाई कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य आर. जी. नलवडे, कार्यक्रम समन्वयक व कार्यक्रम अधिकारी प्रा. एस. एम. एकतपुरे तसेच पशुसंवर्धन विभागातील प्रा. डी. एस. मेटकरी, ग्रामपंचायत पदाधिकारी, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. महेश वाघमोडे व पिसेवाडीतील ग्रामस्थांचे सहकार्य लाभले. या यशस्वी जनजागृती व लसीकरण उपक्रमाचे आयोजन कृषीकन्या अंजली कदम तन्वी साबळे वैष्णवी कांबळे साक्षी भोसले निशा काळे पायल पवार नृत्या गेंड साक्षी पोळ यांनी केले.

### उजनी उजवा व डावा कालव्यासह नदीपात्रात पाणी सोडण्यात यावे : शशिकांत चव्हाण

**मंगळवेढा, दि. ११ जुलै-**

सध्या खरीप पावसाने ओढ दिल्यामुळे कालवा व नदीकाठची पिके धोक्यात आली असून, उजनी धरण सध्या ५० टक्के पर्यंत भरल्याने उजवा व डावा कालव्यासह भीमा नदीपत्रात देखील पाणी सोडण्यात यावे, अशी मागणी भाजपा जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण यांनी अधीक्षक अभियंता लाभक्षेत्र विकास प्राधिकरण यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. यावेळी भाजप जिल्हा सरचिटणीस विकास वाघमारे उपस्थित होते. यावेळी वीज पुरवठा सुरळीत करण्याबाबत देखील निवेदन देण्यात आले या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, जिल्ह्यात आज अखेर अतिशय कमी प्रमाणात पर्जन्यमान झाल्यामुळे चालू स्थितीत खरीप हंगाम पूर्णपणे वाया गेल्याने जिल्ह्यातील शेतकरी हवालदील झाला. शेतकऱ्यांना पाण्याअभावी ऊस व फळबागा जोपासणे देखील जिकरीचे झाले. त्यासोबत भीमा नदीपात्र देखील गेल्या दोन महिन्यापासून कोरडे असून नदीकाठचा शेतकरी अडचणीत आलेला आहे. पाणी नसल्याकारणाने पिके जळून जात आहेत. सध्याची उजनीची परिस्थिती पाहता धरणात समाधानकारक साठा असून नदीवर अवलंबून अनेक ठिकाणच्या पिण्याच्या पाण्याच्या योजना यामध्ये माढा, माळिशरस, पंढरपूर, सांगोला, मोहोळ, मंगळवेढा, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, सोलापूर शहर या शहरांचा व जिल्ह्यातील ग्रामीण पाणीपुरवठा योजनांचा समावेश असल्याने सदरील योजना देखील सुस्थितीत चालण्यासाठी भीमा नदीपात्रात पाणी सोडण्यात यावे, अशी मागणी केली.

# आरोग्याच्या 'डॅम' भोवती चौकशीचा फास?

## लेखाकारभारावर प्रश्नचिन्ह; प्रलंबित देयके, कामकाजात विलंब, कर्मचाऱ्यांच्या तक्रारींनी वाढला वाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जुलै-**

जिल्हा आरोग्य विभागातील आर्थिक व प्रशासकीय कामकाज पुन्हा एकदा चर्चेत आले असून ( डॅम) जिल्हा लेखा व्यवस्थापक वैशाली थोरात यांच्या कामकाजाबाबत विभागीय स्तरावर चौकशी सुरू असल्याची माहिती समोर येत आहे. यापूर्वीही त्यांच्या कार्यपद्धतीबाबत अनियमिततेच्या तक्रारी झाल्याची चर्चा असून, नव्या चौकशीमुळे आरोग्य विभागातील लेखा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

रुग्णवाहिकेच्या चालकांचे एक वर्षांपासूनचे पगार प्रलंबित ठेवणे, कंत्राटदारांची बिले दीर्घकाळ प्रलंबित ठेवणे, विविध देयकांच्या मंजुरीत अनावश्यक विलंब करणे, पत्रकारांच्या जाहिरात व प्रसिद्धीविषयक देयकांचा निपटारा न करणे, तसेच आर्थिक व्यवहारांमध्ये वेळेत निर्णय न घेणे, अशा अनेक बाबींवरून संबंधित अधिकाऱ्यांविरोधात नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे अनेक विकासकामे आणि पुरवठादारांचे व्यवहारही रखडल्याचे सांगितले जात आहे.

याशिवाय, रुग्णवाहिका चालकांच्या वेतन वितरणात विनाकारण अडथळे निर्माण झाल्याच्या तक्रारी पुढे आल्या आहेत. वेळेत वेतन न मिळाल्याने संबंधित कर्मचाऱ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचेही सांगितले जाते. काही कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन कामकाजादरम्यान उद्धट वागणूक मिळत असल्याची आणि वारंवार वाद निर्माण होत असल्याचीही तक्रार वरिष्ठांकडे केल्याची माहिती आहे. आरोग्य विभागातील अनेक फाईली आणि आर्थिक प्रस्ताव दीर्घकाळ प्रलंबित राहत असल्याने प्रशासकीय कामकाजाचा वेग मंदावल्याची भावना विभागातील कर्मचारी आणि संबंधित घटकांमध्ये व्यक्त होत आहे. त्यामुळे आर्थिक शिस्त, पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाबाबतही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. दरम्यान, सुरू असलेल्या चौकशीत संबंधित तक्रारींची वस्तुस्थिती तपासली जाणार असून, चौकशी अहवालानंतरच पुढील प्रशासकीय निर्णय होण्याची शक्यता आहे. चौकशीत आरोप सिद्ध झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई होण्याचीही चर्चा विभागात सुरू आहे. राज्याचे आरोग्य विभागाच्या आयुक्तांनी पंढरपुरात झालेल्या बैठकीत जिल्हा आरोग्य अधिकारी तसेच जिल्हा लेखा व्यवस्थापक यांना आरोग्य विभागातील कारभारावरून खडेबोल सुनावल्याचे सांगण्यात येत आहे. वारंवार प्राप्त झालेल्या तक्रारीवरून आयुक्त यांनी जिल्हा लेखा व्यवस्थापक वैशाली थोरात यांनी प्रलंबित देयके सोमवारपर्यंत अदा केले नाही तर, त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याचा सज्जड इशारा दिला आहे. या घटनेमुळे आरोग्य विभागात एकच खळबळ माजली आहे.



**अद्याप चौकशी सुरू**

जिल्हा लेखा व्यवस्थापक थोरात यांच्या विरोधात तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यासंबंधी अद्याप चौकशी सुरू आहे.

**- डॉ. संदूले, ए.डी.एच.एस.पुणे तथा अध्यक्ष चौकशी समिती**

**अहवाल प्राप्त झाल्यानंतर निर्णय**

जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात कार्यरत असणाऱ्या जिल्हा लेखा व्यवस्थापक वैशाली थोरात यांच्या विरोधात प्राप्त झालेल्या तक्रारीवर वरिष्ठ स्तरावर चौकशी सुरू असून चौकशीअंती अहवाल प्राप्त झाल्यानंतर यासंबंधी निर्णय घेतला जाईल.

**- वर्षा डोईफोडे, जिल्हा शल्यचिकित्सक सिव्हिल हॉस्पिटल**



### पापरीच्या आदर्श शाळा मॉडेलचा कुरुल गटात विस्तार : जाधव

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. ११ जुलै-**

**कुरुल गटातील शाळांचा अभ्यास दौरा**

कुरुल जिल्हा परिषद गटातील प्रत्येक शाळा पापरीच्या धर्तीवर आधुनिक, डिजिटल आणि गुणवत्तापूर्ण करण्याचा संकल्प असल्याचे जि.प. सदस्य सचिन जाधव यांनी सांगितले. त्यासाठी आवश्यक निधी व सुविधा उपलब्ध करून देण्यास प्राधान्य दिले जाईल, असेही स्पष्ट केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे या उद्देशाने कुरुल सचिन जाधव यांनी राज्यात नावारूपाला आलेल्या पापरी व खंडाळी (इंगोले वस्ती) येथील डिजिटल शाळांचा अभ्यास दौरा केला. दौऱ्यात त्यांनी डिजिटल शिक्षण, गुणवत्तापूर्ण अध्यापन, विद्यार्थीकेंद्रित उपक्रम आणि शाळा व्यवस्थापनाची माहिती शिक्षकांकडून जाणून घेतली. पापरी येथील जिल्हा परिषद शाळेने आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, नावीन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या बळावर राज्यस्तरावर विशेष ओळख निर्माण केली आहे. फेस रिडिंग प्रणालीमुळे विद्यार्थ्यांच्या उपस्थितीची अचूक नोंद ठेवली जाते. शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता आणि सुविधा पाहता येथे प्रवेशासाठी पालकांची मोठी गर्दी होत असून सुमारे ९५० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. खंडाळी (इंगोले वस्ती) येथील डिजिटल शाळेतील स्मार्ट वर्गखोल्या, आधुनिक अध्यापन पद्धती आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठीचे उपक्रमही जाधव यांनी पाहून घेतले. डिजिटल साधनांचा वापर, पालकांचा सहभाग, लोकसहभाग आणि शाळा विकासाबाबत माहिती घेतली. यावेळी पंचायत समिती उपसभापती राजकुमार पाटील, सदस्य गणेश मुळे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजेंद्र शेळके, मुख्याध्यापक आबासाहेब टेकाळे, गटशिक्षण अधिकारी अविचल महाडिक, माजी उपसरपंच अजित भोसले, सोमनाथ व्यवहारे, सोनाली भोसले, माया भोसले उपस्थित होते.

## पुराचे अतिरिक्त वाहून जाणारे पाणी दुष्काळी सांगोल्याला सोडावे

**माजी आ. दिपकआबा साळुंखे-पाटील यांची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ११ जुलै-**

कृष्णा, कोयना, भीमा, पंचगंगा आणि नीरा नदीच्या पात्रातून पुराच्या रूपाने वाहून जाणारे अतिरिक्त पाणी तत्काळ टेंभू उपसा सिंचन योजना, म्हैसाळ उपसा सिंचन योजना तसेच नीरा उजवा कालव्यातून पावसाच्या प्रतिक्षेत असणाऱ्या सांगोला तालुक्याला सोडावे अशी मागणी माजी आ. दिपकआबा साळुंखे पाटील यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. सांगोला तालुक्यात पावसाने अद्याप हजेरी न लावल्याने हजारो हेक्टरवर होणाऱ्या खरिपाच्या पेरण्या खोळंबल्या आहेत. शेतकऱ्यांचे विहिरी, तलाव आणि कुपनलिका तसेच अन्य जलस्रोतांनी तळ गाठल्याने पिण्याच्या पाण्याचीही समस्या गंभीर होऊ लागली आहे.



त्यामुळे ऐन पावसाळ्यात तालुक्यातील काही गावांना टँकरने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याची वेळ आली आहे. राज्य सरकारने या गोष्टीची गंभीर दखल घेऊन दुष्काळग्रस्त सांगोला तालुक्याला दिलासा देण्यासाठी तात्काळ टेंभू योजना, म्हैसाळ योजना आणि नीरा उजवा कालव्यातून सांगोला तालुक्याला पाणी सोडावे अशी मागणी दिपकआबा साळुंखे पाटील यांनी ना. राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याकडे केली आहे.

**पूरग्रस्त आणि दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मिळणार दिलासा**

सध्या कृष्णा, कोयना, निरा, पंचगंगा या नद्यांच्या परिसरात होणाऱ्या अतिवृष्टीमुळे नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली आहे. यामुळे नदीच्या काठावरील लोकांना पुराचा धोका निर्माण झाला आहे. तर दुसरीकडे पावसाळा सुरू होऊन तब्बल दीड महिना उलटला तरीही, पावसाच्या प्रतीक्षेत असणाऱ्या सांगोला तालुक्यात भीषण पाणीटंचाई जाणवू लागली आहे. पुराचे अतिरिक्त पाणी टेंभू योजना, म्हैसाळ योजना व नीर उजवा कालव्यातून दुष्काळी सांगोला तालुक्याला सोडल्यास पूरग्रस्त आणि दुष्काळग्रस्त दोन्ही शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. याबाबत मी ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याशी चर्चा केली असून त्यांनी याबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

**- दिपकआबा साळुंखे-पाटील,**
माजी आमदार

### लग्नाचे आमिष दाखवून पीडितेवर लैंगिक अत्याचारप्रकरणी आरोपीस जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ११ जुलै-**

बार्शी येथील मे.सत्र न्यायाधीश एस. व्ही. केंद्रे यांनी आरोपी शिवलिंग हरिभाऊ गुळवे यास लग्नाचे अमिष दाखवून पीडितेवर लैंगिक अत्याचार केल्या प्रकरणाच्या गुन्ह्यात जामीन मंजूर करुन दिला.

पीडितेने बार्शी शहर पोलीस ठाण्यामध्ये आरोपी शिवलिंग गुळवे याचे विरुद्ध त्याने सन २०२० ते २०२६ या दरम्यान पीडीतेसोबत लग्नाचे खोटे अमिष दाखवून वेळोवेळी लैंगिक अत्याचार केल्यासंदर्भात तक्रार दाखल केली होती. पीडितेच्या तक्रारीवरुन बार्शी शहर पोलीस ठाणे येथे आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल झाला. सदर फिर्यादीच्या अनुषंगाने दाखल गुन्ह्यावरुन पोलिसांनी संशयित आरोपीस अटक केली व न्यायालयाने आरोपीची रवानगी न्यायालयीन कोठडीमध्ये केली. त्यानंतर आरोपीने ॲड. अमोल अलाट यांचेमार्फत बार्शी येथील सत्र न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला. सदर जामीन अर्जावर सुनावणी होऊन आरोपीच्या वकिलांनी केलेल्या युक्तिवादमुळे दि. १० जुलै रोजी न्यायालयाने आरोपीला जामीन मंजूर केला. सदर जामीन प्रकरणात आरोपीतर्फे ॲड. अमोल अलाट, ॲड. विशाल गोणेकर, ॲड. पी. पी. वाघमारे, ॲड. पांडुरंग घोलप यांनी काम पाहिले तर फिर्यादी तर्फे ॲड. सुदर्शन सोनवणे, ॲड. योगीराज पुरवंत यांनी काम पहिले.

## शंकरलिंग वळसंग व शिवाजी हायस्कूल विजेता

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. ११ जुलै-**

जिल्हास्तरीय शालेय खो-खो स्पर्धेत मुलांच्या गटात श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशाला वळसंग तर मुलींच्या गटात येथील छत्रपती शिवाजी हायस्कूलने विजेतेपद पटकाविले.



अक्कलकोट एज्युकेशन सोसायटीचे दिवंगत चेअरमन, दानशूर शिक्षणमहर्षी कै. शिवशरण खेडगी यांच्या चौथ्या पुण्यस्मरण दिनानिमित्त चेअरमन बसलिंगप्पा खेडगी मित्र परिवाराच्या वतीने सी. बी. खेडगी महाविद्यालयात या स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत मुलांचे नऊ तर मुलींचे आठ संघ सहभागी झाले होते. या स्पर्धेचे उद्घाटन अक्कलकोट एज्युकेशन सोसायटीचे संचालक ॲड. अनिल मंगरुळे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन बसलिंगप्पा खेडगी उपस्थित होते.

कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अंकुश शिंदे, उपप्राचार्य व्ही. एन. वैद्य, पर्यवेक्षक एस. एन. भरमशेट्टी, समन्वयक डॉ. सी. डी. अणेकर, निलव्वाबाई खेडगी प्रशालेचे मुख्याध्यापक जयदिप साखरे उपस्थित होते.

स्पर्धेचे पंच म्हणून गोविंद चव्हाण आणि अविनाश राठोड यांनी जबाबदारी पार पाडली. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी जिम खाना विभागप्रमुख डॉ. डी. एम. बिराजदार, प्रा. सोहेल शेख, सुधीर राठोड आदींनी परिश्रम घेतले.

**अंतिम निकाल (प्रथम तीन) : मुले :** श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशाला (वळसंग), उडगी प्रशाला (उडगी), शिवचलेश्वर प्रशाला, मैंदर्गी. **मुली :** छत्रपती शिवाजी हायस्कूल (सोलापूर), उडगी प्रशाला (उडगी), जिल्हा परिषद हायस्कूल, (सोरेगाव).

### कॉलेजला जाते असे सांगून घराबाहेर पडलेली तरुणी बेपत्ता

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ११ जुलै-**

बार्शी शहरातील विठ्ठलनगर परिसरात राहणारी १८ वर्षीय विद्यार्थिनी कॉलेजला जाते असे सांगून घरातून बाहेर पडली. मात्र, त्यानंतर ती घरी परत न आल्याने तिच्या वडिलांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली असून पोलिसांनी तिचा शोध सुरु केला आहे. लक्ष्मी सुरेश इंगळे (वय १८) ही बी. पी. सुलाखे महाविद्यालयात शिक्षण घेत आहे. ४ जुलै २०२६ रोजी सकाळी सुमारे ७ वाजता ती कॉलेजला जात असल्याचे सांगून घरातून निघाली होती. महाविद्यालयाची वेळ संपल्यानंतरही ती घरी परतली नाही. कुटुंबीयांनी तिच्या मोबाईलवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता मोबाईल बंद असल्याचे आढळून आले. यानंतर कुटुंबीयांनी महाविद्यालय परिसर, बार्शी शहरातील विविध ठिकाणे तसेच नातेवाईकांकडे शोध घेतला. मात्र, तिचा कोणताही ठावठिकाणा लागला नाही. अखेर तिचे वडील सुरेश प्रकाश इंगळे यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. बार्शी शहर पोलिसांनी बेपत्ता विद्यार्थिनीचा शोध सुरु केला असून, तिच्याबाबत कोणालाही माहिती मिळाल्यास तात्काळ बार्शी शहर पोलीस ठाण्याशी किंवा जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## माढ्यातील सिंचन प्रश्नांवर मंत्रालयात बैठक

**मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे निर्देश; आ. पाटील यांच्या पुढाकारातून बैठक**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ११ जुलै-**

जलसंधारण व जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालय, मुंबई येथे सीना-माढा उपसा सिंचन योजना तसेच खैराव-मानेगाव उपसा सिंचन योजना संदर्भात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीत माढा तालुक्यातील शेतकरी बांधवांच्या सिंचनाशी संबंधित विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी सीना-माढा उपसा सिंचन योजनेत तुळशी, बावी, परितेवाडी, अंजनगाव (खे.), कुर्डू, अंबाड व पिंपळखुटे या सात गावांचा समावेश करणे, सुमारे २० वर्षे जुन्या झालेल्या मोटारींच्या जागी नवीन मोटारी बसविणे, सीना नदीच्या बोगद्यात नियोजनबद्ध पद्धतीने पाणी सोडणे, खैराव-मानेगाव उपसा सिंचन योजना तातडीने सुरू करणे, प्रकल्पासाठी संपादित झालेल्या जमिनीवरील फळझाडांच्या प्रलंबित नुकसानभरपाईचे तातडीने वाटप करणे तसेच नदीकाठावरील विस्कळीत विद्युत व्यवस्था सुरळीत करण्याच्या मागण्या करण्यात आल्या.

मंत्री श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांनी सर्व मागण्या गांभीर्याने ऐकून घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. तसेच सीना-माढा उपसा सिंचन प्रकल्प व खैराव-मानेगाव उपसा सिंचन योजनेची कामे गतीने पूर्ण करण्यासाठी सकारात्मक निर्णय घेण्याचे निर्देश दिले.

माढा तालुक्यातील शेतकरी बांधवांच्या सिंचनासंदर्भातील प्रलंबित प्रश्न सोडवून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू राहणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

यावेळी आमदार नारायण पाटील, भारत शिंदे, अमोल गायकवाड, विजय भगत, शरद मोरे, प्रकाश चोपडे, राजाभाऊ भांगिरे, संजय भोंगे, राजु भानवासे, गणेश गुंडगिरे, बंडु घाडगे, अजिंक्य काटकर, बालाजी टोणपे, रामकृष्ण चोपडे, बाळासाहेब चोपडे उपस्थित होते.

## करकंब येथे उद्या सुवासिनी पूजन आणि चौंडेश्वरी भावई उत्सव

**करकंब कोष्टी समाज जपतोय शेकडो वर्षांची परंपरा**

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. ११ जुलै-**

शंभर वर्षांपासून सुरू असलेला भावई उत्सवानिमित्त चौंडेश्वरी कोष्टी समाज ट्रस्ट करकंब यांच्या मार्गदर्शनाखाली चौंडेश्वरी ज्येष्ठ अमावस्या दिवशी आणि समस्त करकंब कोष्टी समाज बांधवांच्या सहकार्याने प्रतिवर्षाप्रमाणे १३ जुलै सोमवारी दुपारी ११:३० वा भारत वास्ते आणि लक्ष्मण वास्ते परिवाराच्या वतीने सुवासिनी पूजन आणि भोजन आयोजित करण्यात आले आहे.

तसेच १४ जुलै मंगळवारी सकाळी १०:३० वा श्री चौंडेश्वरी भावई मंदिरातून निघणार असून सोमवार पेठ, मोती चौक, मेन रोड, शुक्रवार पेठ येथून दिलीप शिंदे यांचे घरी येऊन मिरवणूकीचा शेवट होऊन चौंडेश्वरी मंदिरात येते. यावेळी ठिकठिकाणी भावईचे पूजन केले जाते. दुष्ट चंड मुंड राक्षसाने सगळीकडे थैमान मांडले होते.



आई चौंडेश्वरी मातेने दुष्ट चंडमुंड राक्षसांचा वध केला. आणि तेंव्हापासून हा उत्सव विविध ठिकाणी साजरा करण्यात येतो. करकंब मध्येही हा उत्सव अनेक वर्षांपासून साजरा करण्यात येतो. यावेळी समस्त कोष्टी समाज बांधवांबरोबर करकंबकरही उत्साहात सहभागी घेतात. हा उत्सव यशस्वी करण्यासाठी नारायण वास्ते, प्रभाकार टेके यांच्या मार्गदर्शनाखाली राजेंद्र टकले, राजेंद्र करपे, प्रभाकर रसाळ, राजेंद्र नडे, चंद्रकांत रसाळ, संजय दुधाणे, जयंत टकले, नवनाथ टकले, अभिजित टेके, सतीश दुधाणे, हरिश्चंद्र वास्ते, धीरज वास्ते, भूषण वास्ते, ज्ञानेश्वर दुधाणे आदी परिश्रम घेत आहेत.

## संक्षिप्त वृत्त...

### सेलूत १.२८ लाखांहून अधिक मतदारांचे मॅपिंग पूर्ण; अनमॅप्ड व अनॉमली मतदारांची तपासणी युद्धपातळीवर : मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेचा आढावा; अचूक मतदार नोंदींसाठी प्रशासनाच्या सूचना

**सेलू,/प्रतिनिधी :** सेलू तालुक्यात एकूण १६५ मतदार यादी भाग असून १ लाख ४५ हजार ५९२ मतदारांची नोंद आहे. त्यापैकी १ लाख २८ हजार ५८० मतदारांचे बीएलओ पद्वारे मॅपिंग पूर्ण झाले आहे. उर्वरित १७ हजार १२ अनमॅप्ड मतदार तसेच २३ हजार १७६ अनॉमली मतदारांच्या नोंदींची तपासणी सुरू असून हे काम गतीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सेलू तालुक्यात विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रम २०२६ वेगाने राबविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी शैलेश लाहोटी यांच्या अध्यक्षतेखाली सेलू येथे सर्व राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, बीएलओ, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी व संबंधित अधिकाऱ्यांची आढावा बैठक पार पडली. यावेळी मतदार याद्या अचूक व त्रुटीमुक्त करण्यासाठी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

मतदार पुनरीक्षण कार्यक्रमानुसार २९ जुलै २०२६ पर्यंत बीएलओमार्फत गणना फॉर्म भरून घेण्याची प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. ५ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार असून ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर या कालावधीत दावे व हरकती स्वीकारल्या जाणार आहेत. त्यानंतर पडताळणी व सुनावणी प्रक्रिया पूर्ण करून ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे.

बैठकीत मार्गदर्शन करताना शैलेश लाहोटी यांनी स्पष्ट केले की, ज्या मतदारांचे छायाचित्र स्पष्ट आहे त्यांचे नवीन छायाचित्र घेण्याची आवश्यकता नाही. केवळ अस्पष्ट किंवा अंधुक छायाचित्रे असलेल्या मतदारांचे फोटो अद्ययावत करावेत. तसेच अनमॅप्ड अथवा नाव, जन्मतारीख, वय आदी बाबींमध्ये त्रुटी असलेल्या मतदारांच्या नोंदींची काळजीपूर्वक तपासणी करून आवश्यक कागदपत्रांच्या आधारे त्यांचा समावेश अंतिम यादीत करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

बैठकीस तहसीलदार डॉ. शिवाजी मगर, सेलू नगर परिषदेचे मुख्याधिकारी महेश गायकवाड, नगराध्यक्ष मिलिंद सावंत, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, बीएलओ, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी व पत्रकार उपस्थित होते. मतदार नोंदणी प्रक्रियेत पारदर्शकता आणि अचूकता राखण्यासाठी सर्व राजकीय पक्षांच्या बूथस्तरीय प्रतिनिधींनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

### सिमेंट रस्त्यावरील भेगात चाक अडकल्याने मोटारसायकलस्वाराचा मृत्यू : गंगाखेड जवळील दुर्देवी घटना

**गंगाखेड,/प्रतिनिधी :** गंगाखेड ते परभणी या दरम्यान रस्त्यावर पडलेल्या भेगात चाक अडकल्याने व दुचाकी अनियंत्रित होऊन दुभाजकावर आदळल्याने एका २८ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. ही दुर्देवी घटना ८ जूलै रोजी रात्री घडली. गुरुवारी रात्री गंगाखेड पोलिसांनी या प्रकरणात गुन्हा दाखल केला.

गंगाखेड ते परभणी या रस्त्यावर ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणावर भेगा पडल्या आहेत. त्या भेगा आता वाहनधारकांच्या दृष्टीने जीवघेण्या ठरु लागल्या आहेत. महातपुरी येथे शेख अनिस शेख कालू हा २८ वर्षीय तरुण मित्रासह दुचाकीवरुन महातपुरीकडे जात असतांना परळी नाक्याच्या पुढे एका पेट्रोल पंपासमोर दुचाकीचे चाक रस्त्यावरील भेगात अडकल्याने व वाहन अनियंत्रीत होऊन दुभाजकावर आदळल्याने मोटरसायकलस्वार शेख अनिस शेख कालू जखमी झाले. प्रत्यक्षदर्शनींनी तात्काळ या जखमींना परभणीच्या रुग्णालयात दाखल केले खरे, परंतु, गुरुवारी सकाळी या युवकाचा दुर्देवी मृत्यू झाला.

### संपूर्ण कर्जमाफीच्या मागणीसाठी किसान सभेचे पाथरी तहसीलसमोर आंदोलन : कर्जमाफीतील अटी रद्द करण्याची मागणी; मुख्यमंत्र्यांच्या नावे तहसीलदारांना निवेदन

**परभणी,/प्रतिनिधी :** अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने शेतकरी कर्जमाफी योजनेतील अटी-शर्ती रद्द करून सर्व शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देण्यात यावी, या मागणीसाठी शुक्रवारी पाथरी तहसील कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली.

या आंदोलनात कॉ. दीपक लिपने, कॉ. भारत गायकवाड, कॉ. बळीराम वऱ्हाडे, कॉ. भास्कर यादव, कॉ. भारत फुके, कॉ. अंबादास साळवे यांच्यासह किसान सभेचे पदाधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी मुख्यमंत्री व कृषिमंत्र्यांच्या नावे तहसीलदारांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. त्याद्वारे, दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमर्यादा रद्द करून सर्व पात्र शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफीचा लाभ देण्याची मागणी करण्यात आली. तसेच २०१९ मधील कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या लाभार्थ्यांनाही कर्जमाफी देण्यात यावी, नियमित कर्जदारांवरील जाचक अटी हटवाव्यात आणि सहकार क्षेत्रातील कर्मचारी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांतील लोकप्रतिनिधींनाही कर्जमाफी योजनेत समाविष्ट करावे, अशी मागणी करण्यात आली. शेती व शेतीपूरक व्यवसायासाठी घेतलेल्या कर्जांचाही कर्जमाफी योजनेत समावेश करावा, मायक्रो फायनान्स, सोनतारण व इतर शेतीसंबंधित कर्जांना कर्जमाफीचा लाभ द्यावा, अशीही मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. कर्जमाफीवरील जाचक अटींमुळे राज्यातील लाखो शेतकरी चिंतेत असून शासनाने सातबारा कोरा करण्याच्या आश्वासनाची तातडीने अंमलबजावणी करावी, असे निवेदनात नमूद करण्यात आले.

### महाराष्ट्र चेंबरच्या गव्हर्निंग कौन्सिल सदस्यपदी अनुप शुक्ला यांची बिनविरोध निवड

**परभणी,/प्रतिनिधी :** महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अ‍ॅन्ड ॲग्रिकल्चर, मुंबई यांच्या निवडणुकीत परभणी जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत अनुप शुक्ला यांची गव्हर्निंग कौन्सिल सदस्यपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

व्यावसायिक तसेच सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांची या महत्त्वपूर्ण पदावर निवड करण्यात आली. शुक्ला यांच्या निवडीमुळे परभणी जिल्ह्याच्या व्यापारी व उद्योजक क्षेत्राला राज्यस्तरावर प्रभावी प्रतिनिधित्व मिळणार आहे. त्यांच्या निवडीबद्दल विविध व्यापारी संघटना, उद्योजक, सामाजिक संस्थांचे पदाधिकारी आणि नागरिकांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

# जिल्हा मध्यवर्ती बँक निवडणुकीसाठी उमेदवारांना चिन्हांचे वाटप

## २१ पैकी १३ संचालक बिनविरोध; उर्वरित ८ जागांसाठी १९ जुलैला मतदान

**परभणी ,/प्रतिनिधी:-** परभणी जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी शुक्रवारी उमेदवारांना निवडणूक चिन्हांचे वाटप करण्यात आले. बँकेच्या एकूण २१ संचालक पदांपैकी १३ संचालक बिनविरोध निवडून आले असून उर्वरित ८ जागांसाठी निवडणूक होत आहे. या निवडणुकीसाठी १९ जुलै रोजी मतदान तर २० जुलै रोजी मतमोजणी होणार आहे.

प्राथमिक कृषी पतपुरवठा विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था गटातील पूर्णा मतदारसंघातून नंदकुमार डाखोरे यांना ऑटोरिक्षा, तुळशीराम बोबडे यांना कपबशी, मानवत मतदारसंघातून अमोल कदम यांना ऑटोरिक्षा व आकाश चोखट यांना कपबशी, हिंगोली मतदारसंघातून राजामती मुटकुळे यांना कपबशी, रमेश शिंदे यांना छत्री व गुलाबराव सरकटे यांना कपाट, तर वसमत मतदारसंघातून तुषार जाधव यांना अंगठी आणि चंद्रकांत नवघरे यांना कपबशी हे चिन्ह देण्यात आले. कळमनुरी



मतदारसंघातून दत्तराव कदम यांना कपाट व बालासाहेब मगर यांना छताचा पंखा हे चिन्ह मिळाले.

इतर शेती संस्था गटातून खान सय्यद शेरगुल खान यांना छत्री, प्रीती जाधव यांना जग, विजय जामकर यांना कपबशी, विजयकुमार मोरे यांना मोबाईल आणि सय्यद हरसान हुसैनी यांना चष्मा हे चिन्ह देण्यात आले.

अनुसूचित जाती-जमाती मतदारसंघातून प्रशास ठाकूर यांना अंगठी, शोभा बोबडे यांना कपबशी, तुकाराम रुमाले यांना ट्रॅक्टर, यशवंतराव वाटोड यांना शिटी, अतुल सरोदे यांना छत्री आणि संजय सारणीकर यांना हेलिकॉप्टर हे चिन्ह देण्यात आले.

विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग मतदारसंघातील उमेदवार अभय कुंडगीर यांना खटारा, स्वराजसिंह परिहार यांना छत्री, सुनंदा फुलके यांना शिटी, दत्तात्रय मायंदळे यांना कपबशी आणि बळीराम सोरेकर यांना शिवणयंत्र हे निवडणूक चिन्ह देण्यात आले आहे.

### लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर अत्याचार; तिघांविरुद्ध गुन्हा

**सेलू,/प्रतिनिधी-** लग्नाचे आमिष दाखवून एका २० वर्षीय तरुणीवर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार सेलूत उघडकीस आला असून, याप्रकरणी एका महिलेसह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी तातडीने कारवाई करत दोन आरोपींना ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे.

एका आरोपीने पीडित तरुणीशी प्रेमसंबंध असल्याचे भासवून लग्नाचे आश्वासन दिले. त्यानंतर लग्न झाल्याचा विश्वास निर्माण करून तिच्याशी वेळोवेळी शारीरिक संबंध ठेवल्याचा आरोप करण्यात आला आहे. हा प्रकार शहरातील एका लॉजमध्ये तसेच आरोपींच्या राहत्या घरी घडल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, पीडितेने लग्नाबाबत विचारणा केल्यानंतर आरोपींसह एका महिलेने तिला नकार दिला. तसेच जातिवाचक शिवीगाळ करून अपमानित करण्यात आल्याचा आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. पीडितेच्या तक्रारीवरून गणेश परमेश्वर इंगोले, परमेश्वर बाबासाहेब इंगोले आणि अनिता परमेश्वर इंगोले (रा. सालगाव, ता. परतूर) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता तसेच अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. उपविभागीय पोलीस अधिकारी दीपककुमार वाघमारे, पोलीस निरीक्षक अरुण नागरे आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक वर्षा पुंगळे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. या प्रकरणात दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी दीपककुमार वाघमारे करीत आहेत.

## शिक्षकांच्या अनुपस्थितीमुळे ५२ विद्यार्थी दोन तास शाळेबाहेर; घेवडा येथील प्रकाराने खळबळ

### शिक्षण विभागाविरोधात पालक-ग्रामस्थांचा संताप

**जिंतूर ,/प्रतिनिधी-** : तालुक्यातील घेवडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत गुरुवारी शिक्षण व्यवस्थेतील बेफिकिरीचा धक्कादायक प्रकार समोर आला. शाळेतील दोन्ही शिक्षक वेळेवर उपस्थित न राहिल्याने इयत्ता पहिली ते पाचवीतील ५२ विद्यार्थ्यांना तब्बल दोन तास शाळेबाहेर थांबावे लागले. शाळेला कुलूप असल्याने विद्यार्थ्यांचा अभ्यासाचा मौल्यवान वेळ वाया गेला. या घटनेमुळे पालक, ग्रामस्थ आणि शाळा व्यवस्थापन समितीने संताप व्यक्त करत संबंधितांवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, विद्यार्थी नेहमीप्रमाणे सकाळी शाळेत दाखल झाले. मात्र बराच वेळ उलटूनही एकही शिक्षक शाळेत न आल्याने विद्यार्थ्यांना शाळेच्या परिसरातच थांबावे लागले. अखेर शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कृष्णा जाधव यांनी शिक्षण विभागाशी दूरध्वनीवर संपर्क साधून घटनेची माहिती दिली. तक्रारीनंतर सुमारे तासाभराने एक शिक्षक शाळेत पोहोचले.

दरम्यान, या प्रकारामुळे संतप्त पालक व ग्रामस्थांनी शाळा बंद ठेवून शिक्षण विभागाच्या कारभाराविरोधात निषेध नोंदविला. ग्रामीण भागातील गोरगरीब व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाशी खेळ सुरू असल्याचा आरोप करत नागरिकांनी शिक्षण विभागाच्या देखरेखीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

या संदर्भात विस्तार अधिकारी के. सी. घुगे यांनी सांगितले की, शाळेतील एका शिक्षकाची विशेष सघन पुनरिक्षण (एसआयआर) कामासाठी नियुक्ती करण्यात आली आहे, तर दुसरे शिक्षक काही कारणास्तव उशिरा शाळेत पोहोचले. प्रकरणाची माहिती घेतली जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. गट शिक्षणाधिकारी मंजुश्री पल्लेवार यांनी या घटनेची सखोल चौकशी करून संबंधित शिक्षक तसेच विस्तार अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येणार असल्याची माहिती दिली.

**दोषींवर कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशारा...**

शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कृष्णा जाधव यांनी सांगितले की, शिक्षकांच्या अनुपस्थितीमुळे विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान झाले आहे. शिक्षण विभागाला माहिती दिल्यानंतरच शिक्षक शाळेत आले. अशा प्रकाराकडे दुर्लक्ष केले जाणार नाही. दोषी शिक्षकांवर तातडीने कारवाई न झाल्यास भविष्यात पालक व ग्रामस्थांच्या वतीने लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

## येलदरी धरणावर थरार! कंत्राटदाराच्या निष्काळजीपणामुळे मोठी दुर्घटना; स्ट्रक्चरल ऑडिटसाठी आता तरी जाग येणार का?

**जिंतूर ,/प्रतिनिधी-**परभणी जिल्ह्यातील मराठवाड्याची भाग्यरेषा असलेल्या येलदरी धरणावर आज (१० जुलै) सकाळी पावणे बाराच्या सुमारास प्रशासकीय निष्काळजीपणाचा एक भयंकर नमुना समोर आला. धरण सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असलेल्या गेट दुरुस्तीचे काम सुरू असताना क्रेनचा भीषण अपघात झाला. जलविद्युत केंद्रातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी दाखवलेल्या अचाट तत्परतेमुळे क्रेनखाली दबलेल्या उत्तर प्रदेशातील कामगार शिव कुमार याला मृत्यूच्या दाढेतून सुखरूप बाहेर काढण्यात यश आले. मात्र, या घटनेने धरणाच्या एकूणच सुरक्षेचा आणि कंत्राटदारांच्या मनमानी कारभाराचा प्रश्न ऐरणीवर आणला आहे.

कंत्राटदाराचा जीवघेणा निष्काळजीपणा!
येलदरी धरणाच्या जलविद्युत केंद्राच्या मागील बाजूच्या गेट दुरुस्तीचे काम एका बाह्य स्रोत (आउटसोर्सिंग) एजन्सीला देण्यात आले आहे. धक्कादायक बाब म्हणजे, काम सुरू असताना कंत्राटदार कंपनीचा एकही जबाबदार वरिष्ठ अधिकारी किंवा अभियंता घटनास्थळी उपस्थित नव्हता. क्रेन चालवण्याचा कोणताही पूर्वअनुभव नसलेल्या आणि तांत्रिक माहिती नसलेल्या कामगारांच्या भरवशावर हे संवेदनशील काम सोडून देण्यात आले होते. क्रेन सुरू करताना तांत्रिक बाजू न तपासल्यामुळे क्रेन थेट रुळावरून (पटरी) घसरली आणि धरणाच्या मागच्या बाजूला असलेल्या भिंतीवर जाऊन आदळली. यात एक कामगार क्रेनखाली चिरडला गेला होता, त्याला गंभीर दुखापत झाली असून जिंतूर येथे त्याच्यावर उपचार सुरू आहेत.



ऐन पावसाळ्यात येलदरी धरण रामभरोसे?
१९५८ या काळात बांधून पूर्ण झालेल्या या ऐतिहासिक धरणाच्या क्रेनचे या अपघातात प्रचंड नुकसान झाले आहे. ऐन पावसाळ्यात, जेव्हा धरणाचे दरवाजे कधीही उघडावे लागू शकतात, अशा वेळी ही दुर्घटना घडल्याने गेट दुरुस्तीचे काम आता रखडणार आहे. या गंभीर दुर्घटनेनंतर तरी जलसंपदा विभाग कंत्राटदार कंपन्यांना चाप लावणार का? असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. आता स्ट्रक्चरल ऑडिट केल्याशिवाय पर्याय नाही! मराठवाड्यातील पहिल्या मोठ्या धरणांपैकी एक असलेल्या येलदरी धरणाकडे आणि येथील कर्मचारी वसाहतीकडे गेल्या अनेक वर्षांपासून सरकारने सोयीस्कर दुर्लक्ष केले आहे. या अपघातानंतर स्थानिक नागरिक आणि जलतज्ज्ञांमधून तीव्र संताप व्यक्त होत असून खालील मागण्या लावून धरल्या जात आहेत:
तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट करा: धरणाची भिंत, दरवाजे आणि एकूणच रचनेला या अपघातामुळे धक्का पोहोचला आहे का, याची तपासणी करण्यासाठी तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात यावे. कंत्राटदारावर कडक कारवाई: कामाच्या ठिकाणी सुरक्षेचे नियम धाब्यावर बसवणाऱ्या संबंधित बाह्यस्रोत एजन्सीवर तात्काळ गुन्हे दाखल करून त्यांना काळ्या यादीत टाकावे. विशेष निधी मंजूर करा: राज्य शासनाने तात्काळ हस्तक्षेप करून धरणाच्या कायमस्वरूपी देखभाल-दुरुस्तीसाठी आणि कर्मचाऱ्यांच्या प्राथमिक सुविधांसाठी विशेष निधी जाहीर करावा. येलदरी येथील हा अपघात म्हणजे केवळ एक अपघात नसून जलसंपदा विभागाला मिळालेली आर्थिक आणि तांत्रिक धोक्याची घंटा आहे. सरकारने आता तरी गांभीर्याने पावले उचलली नाहीत, तर भविष्यात मोठ्या अनर्थाला सामोरे जावे लागेल ही काळ्या दगडावरची रेघ आहे.

### मातोश्री नगरात घरफोडी; दागिण्यांसह रोकड लंपास

**परभणी,/प्रतिनिधी** : शहरातील मातोश्री नगर परिसरातील एका बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा सुमारे ९३ हजार ४२३ रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी नवा मोंढा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १ जुलै ते ६ जुलै या कालावधीत अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून आत प्रवेश करत चोरी केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. याप्रकरणी नवा मोंढा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# दुचाकी पळवणाऱ्या अल्पवयीन मुलांवर नियंत्रण कोणाचे?

**बाबासाहेब गर्जे**

**सोनपेठ,/प्रतिनिधी-:** मागील अनेक दिवसापासून सोनपेठ शहरांमध्ये भरधाव वेगाने दुचाकी चालवणाऱ्या अल्पवयीन मुलांच्या संकेत लक्षणीय वाढ झाली आहे. याकडे पालक वर्गांचे दुर्लक्ष झाल्याने लहान मुलांच्या हातून दुचाकी चालवत असताना छोटे-मोठे अपघातही घडत आहेत. अखेर या मुलांना निर्बंध तरी कोण लावणार? यासाठी आता पोलीस शासनाने प्रत्येक आठवड्यातून एक दिवस मोहीम राबवून दुचाकी अशा दुचाकी चालवणाऱ्या मोटार सायकल वर दंडात्मक कारवाई करण्याची गरज निर्माण झाली आहे.

सध्याच्या काळात दुचाकी चालवणे हा एक स्टंट झाला असून आणि पालक वर्ग उत्साहामध्ये आपल्या अल्पवयीन मुलाच्या हातामध्ये दुचाकी देत आहेत. त्यामुळे सोनपेठ शहरातील विविध रस्त्यावरून दररोज वेगाने दुचाकी चालवणारे १८ वर्षाखालील अनेक बालक दिसत आहेत. अल्पवयीन मुलाने दुचाकी चालवणे हा खरे तर गुन्हा असून याकडे त्या पालकांनीच गांभीर्याने लक्ष देण्याची गरज



निर्माण झाली आहे. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी उद्या जर पोलीस प्रशासनाने कारवाया करण्याचा धडाका सुरू केलाच तर पालक वर्गांमधून आश्चर्य व्यक्त व्हायला नको. कारण १४ ते १७ वर्षे वयोगटातील अनेक मुलं स्कुटी, मोटरसायकल यासारखे इंजिन असलेले अवजड दुचाकी वाहने चालवत आहेत. वाहन चालवत असताना मुलाचं वय अल्प असल्यामुळे त्यांचे वाहनावर नियंत्रण नसते त्यांच्या सुसाट वाहन चालविण्याच्या वेगांमध्ये लहान मोठे अपघात घडत आहेत. त्यातून मुलांना व इतरांनाही दुखापती होत आहेत. यासाठी सोनपेठ पोलिसांनी किमान आठवड्यातून एक वेळेस मोहीम राबवून संबंधित दुचाकी वर दंडात्मक कारवाई करण्याची गरज निर्माण झाली आहे अन्यथा हा प्रकार असाच पुढे सुरू राहिल्यास अनेक लहान मुलांच्या हातून दुचाकी चालवत असताना एखादा मोठा अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे सुज्ञ पालकांनीही आपल्या लहान व कोवळ्या मुलांकडे दुचाकी सोपविणे हे चुकीचे असल्याचे मत नागरिकांतून व्यक्त केल्या जात आहे.

## अग्रलेख

# पंतप्रधानांची दूरदृष्टी

२० ४७ पर्यंत विकसित भारताचे लक्ष्य गाठण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी एकाचवेळी अनेक आघाड्यांवर काम करत आहेत. देशातील पायाभूत सुविधांचा विकास करताना बदलत्या भू-राजकीय परिस्थितीत आपल्या मित्रदेशांची संख्याही ते वाढवत आहेत. त्यांच्याशी आर्थिक, लष्करी आणि व्यापारविषयक करार करत आहेत. मोदी यांच्या परदेश दौऱ्यांची विरोधक खिल्ली उडवत असताना त्यांच्या प्रत्येक परदेश दौऱ्यातून भारताला काही ना काही मिळाले आहे, देशाचा फायदा झाला आहे याकडेही लक्ष दिले पाहिजे. आज जग इतके छोटे झाले आहे, की एका देशातील घडामोडींचा परिणाम त्याच्या शेजारी देशांवर सहज होत असतो. सध्या जगात इतकी अस्थिर परिस्थिती निर्माण झाली आहे की, कोण कोणाचा मित्र आणि कोण कोणाचा शत्रू हे समजत नाही. त्यामुळे मोदी आपल्या प्रत्येक परदेश दौऱ्यातून शत्रूंची संख्या कमी करताना मित्रांची संख्या वाढवण्याचा प्रयत्न करत आहेत.

विशेष म्हणजे जगातील बहुतांश देशांनाही भारतासोबत मैत्रीचे संबंध हवे आहेत. त्यामुळे भारताने मैत्रीचा हात पुढे केल्यावर अनेक देश भारताशी हस्तांदोलन करण्यास तयार होतात. भारत हा अनेक देशांचा अतिशय विश्वासू असा मित्र आहे. भारताने दुसऱ्या देशाला धोका दिल्याचे, विश्वासघात केल्याचे आणि पाठीत खंजीर खुपसल्याचे एकही उदाहरण नाही. त्यामुळे जगातील अनेक देशांना भारताकडून मोठ्या अपेक्षा आहेत. मोदी भारताचे पंतप्रधान झाल्यानंतर जगात भारताबद्दलचा विश्वास कितीतरी पटीने वाढला. त्यामुळे मोदींना अनेक देशांच्या सर्वोच्च सन्मानाने गौरवान्वित केले जाते. मोदी यांच्यासारखा मुत्सद्दी नेता आजपर्यंत भारतात झाला नाही. त्यामुळेच 'मोदी है तो मुमकीन है' असे म्हटले जाते. त्यामुळेच इतक्या उलथापालथी होत असताना विकासाच्या पथावर भारत अग्रेसर आहे. याउलट पाकिस्तानचे पाहा. पाकिस्तान हा कधीच कुणाचा मित्र होऊ शकत नाही. पाकिस्तानचा इतिहास हा पाठीत खंजीर खुपसण्याचाच राहिला आहे. त्यामुळे जगातील एकही देश, अगदी मुस्लिम देशही, पाकिस्तानवर विश्वास ठेवत नाही. या मुद्यावर तोलून पाहिले तर मोदींचे नेतृत्व आणि कर्तृत्व डोळ्यात भरण्याजोगे आहे.

इस्रायल, अमेरिका आणि इराण युद्धाचा फटका त्या तीन देशांना नव्हे तर जगातील सगळ्या देशांना बसला आहे. इस्रायलने आपले हल्ले थांबवले नसताना इराण आणि अमेरिका यांच्यात युद्धबंदी जाहीर झाली. त्यामुळे जगाने सुटकेचा निःश्वास सोडला असताना नव्याने त्या युद्धाचा भडका उडाला आहे. दुसरीकडे रशिया आणि युक्रेन यांचे युद्ध अजूनही संपलेले नाही, ते कधी संपेल, हे कोणी सांगू शकत नाही. इराणला आपला अणु कार्यक्रम राबवू देणार नाही, अशी अमेरिकेची भूमिका आहे. इराणवरील अमेरिकेच्या हल्ल्याचे दर्शनी कारण तरी तेच आहे. इराणने आपले समृद्ध युरेनियम अमेरिकेच्या ताब्यात द्यावे, अशी अमेरिकेची मागणी आहे. अणुबॉम्बची निर्मिती या समृद्ध युरेनियममधूनच करता येते. इराणला आपला अणुबॉम्ब बनवता येऊ नये म्हणून अमेरिकेने इराणकडे समृद्ध युरेनियमची मागणी केली आहे. इराण आपले समृद्ध युरेनियम अमेरिकेला देईल की नाही, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही, मात्र अशा परिस्थितीत भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात आर्थिक, लष्करी आणि व्यापारविषयक १८ करार झाले आहेत. यातील सर्वात महत्त्वाचा करार हा परमाणु ऊर्जा, समुद्री सुरक्षा आणि दुर्लभ खनिजसंबंधीचा आहे. ऑस्ट्रेलियाने भारताला युरेनियम देण्याची तयारी दर्शवली आहे. भारत या युरेनियमचा उपयोग अण्वस्त्र बनवण्यासाठी नाही तर अणुऊर्जेसाठी करणार आहे. भारताच्या दृष्टीने ही मोठी उपलब्धी म्हटली पाहिजे. या युरेनियमचा वापर भारतातर्फे परमाणू ऊर्जा प्रकल्पात स्वच्छ ऊर्जेसाठी केला जाणार आहे. भारत आणि इराण किंवा पाकिस्तान यांच्यात हाच फरक आहे. इराण युरेनियमचा वापर अणुबॉम्ब बनवण्यासाठी करत आहे, तर भारत अणुऊर्जेसाठी. या विश्वासापोटीच ऑस्ट्रेलियाने भारताला युरेनियम देण्याची तयारी दर्शवली आहे. चाकू कोणा बदमाशाच्या हातात आला तर तो खून करू शकतो, मात्र तो एखाद्या डॉक्टरच्या हातात असला तर तो शस्त्रक्रिया करून रुग्णाचे प्राण वाचवू शकतो. युरेनियमची स्थिती तंतोतंत तशीच आहे.

कधीकाळी जगात रशिया आणि अमेरिका या दोनच महाशक्ती होत्या. त्यावेळी भारत हा रशियाचा मित्र होता, पाकिस्तानला अमेरिकेचा आधार होता. काळाच्या ओघात रशिया महाशक्ती राहिली नाही. कारण सोविएत युनियनचे विघटन झाले. त्यामुळे अमेरिका ही एकमेव महाशक्ती उरली होती. पण अमेरिकेला महाशक्तिपद टिकवणे जमेनासे झालेले दिसते. डोनाल्ड ट्रम्प यांच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात तर अमेरिका खूपच बेभरवशाचा देश झाला आहे. ट्रम्प आपल्या मनमानी वागणुकीने अमेरिकेसोबत जगाचाही सत्यानाश करायला निघाले असल्याचे दिसते आहे. कधी ट्रम्प आपण भारताचे हितैषी असल्याचे दाखवतात, तर कधी दुसऱ्याच क्षणी कोलांटउडी मारतात. दुसरी महाशक्ती म्हणून रशियाची जागा आज चीनने घेतली आहे, हे मान्य करावे लागते. पण चीन हा लोकशाही मानणारा देश नाही. चीनची वागणूकही अशीच बेभरवशाची आहे. मुळात चीन हा भारताचा कधीच मित्र नव्हता. आजही चीनची वागणूक भारताचा मित्र कमी आणि शत्रू जास्त अशी आहे. जगात आजपर्यंत भारताचे चीन आणि पाकिस्तान या दोन देशांसोबतच युद्ध झाले आहे. चीन हा भारतासाठी कधीच विश्वासार्ह नव्हता. त्यामुळे भारताने चीन आणि अमेरिका यांच्यापासून सारख्या अंतरावर राहण्याची भूमिका घेत नवे मित्र जोडण्याची सुरुवात केली आहे. त्याची सुरुवात ऑस्ट्रेलियासोबतच्या करारातून झाली आहे. प्रत्येक देशाला आत्मसन्मानासोबत आत्मसुरक्षेचाही अधिकार असतोच. या अधिकाराचा वापर करीत भारताने प्रशांत महासागरातील देशांना सोबत घेऊन समुद्री सुरक्षेच्या संदर्भात नवी भूमिका घेतली आहे. मुळात अलिप्त राष्ट्र चळवळ ही भारताची मूळ आणि जुनी भूमिका. पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू आणि त्यानंतरच्या बहुतेकांनी अलिप्ततावादी धोरण राबविले. चीन, रशिया आणि अमेरिका या देशापासून सारख्या अंतरावर राहण्याची ही भूमिका होती. त्यात थोडे फार बदल काळाच्या ओघात होतातच. अलिप्ततावाद ही त्या काळाची गरज असेलच. आता भूमिका घेण्याचे दिवस असतील तर ती घ्यावी लागेल. या अर्थाने चीन, रशिया आणि अमेरिका यांच्या प्रभावात नसलेल्या वा या देशांच्या लष्करी कारवाईचा फटका बसलेल्या देशांना एकत्र आणत भारताला नवी महाशक्ती म्हणून मान्यता प्राप्त करून देण्याचा मोदी यांचा प्रयत्न आहे. मोदी यांच्या या प्रयत्नांना जगातून काही देशांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. भारत-ऑस्ट्रेलिया कराराकडे या भूमिकेतूनही पाहायला हवे.

मोदी आपल्या दूरदृष्टीसाठी ओळखले जातात. देशाला परमवैभवाला नेण्याचे रा. स्व. संघ अनेक वर्षांपासून पाहत असलेल्या स्वप्नांची पूर्तता करण्याची जबाबदारी संघाचे प्रचारक असलेल्या मोदींनी पंतप्रधान म्हणून आपल्या शिरावर घेतली आहे. ती जबाबदारी ते यशस्वीपणे पार पाडतील, यात शंका नाही, त्या दिशेने भारताची वाटचाल सुरू झाली आहे. या प्रवासातील बराच मोठा पल्लाही भारताने गाठला आहे. एकापाठोपाठ एक असे आंतरराष्ट्रीय करार आणि साऱ्या जगात भारताच्या भूमिकेला मिळत असलेला प्रतिसाद हे त्याचेच द्योतक आहे. मोदींच्या परराष्ट्र धोरणाला मिळालेले उल्लेखनीय यश म्हणूनही याकडे पाहता येईल. ■

## यंगिस्तान

# खरे गद्दार कोण ?

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे नेते शरद पवार यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विधिमंडळातील दालनात सदिच्छा भेट घेतली आणि शिंदेंनी त्यांचे स्वागत केले. ही बातमी कळताच उबाठा गटाचे नेते संजय राऊत भलतेच चिडलेत. शरद पवारांसारख्या ज्येष्ठ नेत्याने गद्दारांना का भेट दिली असा सवाल त्यांनी उठवला आहे. या भेटीमुळे त्यांचं मनही दुखावलं गेलं असल्याचं त्यांनी म्हटलं. खरं पाहता मन दुखावलं जाण्याच्या वयाचा टप्पा त्यांनी पार केला आहे. पण ते असो. काही वर्षांपूर्वी उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना एकनाथ शिंदे त्यांच्या नजरेखालून ४० आमदार घेऊन आसामला निघून गेले आणि त्यानंतर त्यांनी वेगळा गट स्थापन केला. पुढे त्यांनी शिवसेना पक्षावरच दावा केला आणि ठाकरेंची मक्तेदारी असलेला शिवसेना पक्ष स्वतःच्या ताब्यात घेतला. या घटनेनंतर उद्धव ठाकरे, संजय राऊत याणि त्यांच्या मंडळींनी एकनाथ शिंदे आणि त्यांच्या सहकाऱ्यांना गद्दार म्हणायला सुरुवात केली. महाराष्ट्रातील ठेवलेल्या पत्रकारांनीही याची री ओढायला सुरुवात केली आणि शिंदे गद्दार आहेत हे नॅरेटिव्ह सेट केलं. जणू उद्धव ठाकरे म्हणजे महाराष्ट्र आहेत, महाराष्ट्राची अस्मिता आहेत आणि त्यांचा पक्ष फोडल्याने खूप मोठं पाप झालंय. पण जे शरद पवार एकनाथ शिंदेंच्या दालनत भेटायला गेले, त्यांनीच तर या फोडाफोडीच्या राजकारणाचा पाया उभा केला आहे, हे ही मंडळी विसरली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सुद्धा काँग्रेस फोडूनच स्थापन झालेला आहे. तेही असो. पण आपला मुद्दा असा आहे की उद्धव ठाकरे यांच्याशी फारकत घेणे हा जणू महाराष्ट्राचा वा देशाचा अपमान आहे अशा प्रकारचं नॅरेटिव्ह पसरवण्यात आलं. ठाकरेंनी देखील प्रत्येक भाषणांत गद्दार हा शब्द वापरून त्या शब्दास अजरामर केले. मात्र आपण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की शिंदे-ठाकरे वाद जो काही असेल, त्यात महाराष्ट्राचं भलं नसलं तरी नुकसानही नाही. हे त्यांचं वैयक्तिक आणि राजकीय शत्रुत्व आहे. त्याच्याशी महाराष्ट्राच्या अस्मितेचा काहीही संबंध नाही. सतत गद्दार या शब्दाचा अतिवापर केल्यामुळे मूळ गद्दार कोण आहेत याकडे डोळेझाक होते.

हिंदवी स्वराज्य स्थापन करणाऱ्या शिवरायांशी ज्यांनी फारकत घेतली, धर्मवीर शंभूराजेंना ज्यांनी पकडून देण्यासाठी साहाय्य केलं ते खरे गद्दार आहेत. इंग्रजी सत्तेशी जे एकनिष्ठ राहिले ते गद्दार आहेत. सावरकरांचे नातू सात्यकी सावरकर यांनी न्यायालयात असं वक्तव्य केल्याची बातमी वाचली की जर सावरकरांनी ब्रिटिशांशी तडजोड केली असती तर १९४६ मध्ये ब्रिटिशांनी त्यांना भारताचे पंतप्रधान म्हणून नेमले असते. या वक्तव्यात तर्क आहे. आपल्याला गद्दार कोण हे ओळखता आलं पाहिजे. या लेखप्रपंचाचा घाट अशासाठी घातला आहे, कारण केरळमधल्या मल्लपुरम येथील मोहम्मद सनूफ या माणसाला यूएपीए कायद्यांतर्गत अटक करण्यात आली आहे. आता तुम्ही विचाराल की याला अटक का झाली ? तर हा माणूस खरा गद्दार आहे. कसं ते सांगतो.

२२ एप्रिल २०२५ रोजी जम्मू-काश्मीरमधील प्रसिद्ध पर्यटनस्थळ पहलगाम येथील बैसरन या परिसरात भीषण जिहादी दहशतवादी हल्ला झाला. दुपारच्या सुमारास सशस्त्र दहशतवाद्यांनी धर्म विचारून हिंदू पुरुषांना ठार केले. या हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये २५ पर्यटक आणि एक स्थानिक नागरिक यांचा समावेश होता, तर अनेक जण गंभीर जखमी झाले. मृतांमध्ये महाराष्ट्रासह गुजरात, कर्नाटक, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, हरयाणा आणि इतर राज्यांतील नागरिकांचा समावेश होता. हा हल्ला जिहादी संस्कृतीनुसार त्यांच्या ईश्वरासाठी करण्यात आला होता. कारण त्यांच्या संस्कृतीनुसार इतर धर्मांच्या लोकांना जिवंत राहण्याचा अधिकारच नाही. काश्मीर खोऱ्यातील हिंदूंचा संहार, इंग्रजांच्या काळातील मोपल्यांचे बंड, डिरेक्ट अॅक्शन अशी भारतातील अनेक उदाहरणे देता येतील. परदेशातीलही उदाहरणे देता येतील. या हल्ल्याने अनेकांना दुःख झालं. अनेकांनी जिहादी अतिरेक्यांना धडा शिकवण्याची मागणी केली. सरकारने 'ऑपरेशन सिंदूर' राबवून सर्वांचा प्रतिशोधही घेतला. मात्र या हल्ल्यामुळे अनेकांना आनंदही झाला. जे संजय राऊत उद्धव ठाकरेंशी फारकत घेणाऱ्या आणि वेगळी चूल मांडणाऱ्या एकनाथ शिंदेंना गद्दार म्हणतात, त्याच संजय राऊतांनी पहलगाम हल्ला हा धर्मावर आधारित नव्हता असं वक्तव्य केलं. अतिरेक्यांनी धर्म विचारून गोळ्या झाडल्या हे सबंध जगाने पाहिलं, पण संजय राऊत यांना जिहाद्यांची प्रचंड काळजी वाटत होती. त्यांनी भाजपवर प्रचंड टीका केली.

तर वाचकहो, आपण मूळ मुद्यावर येऊया. या हल्ल्यानंतर सोशल मीडियावर विविध प्रतिक्रिया उमटल्या. अशाच एका प्रकरणात केरळमधील २६ वर्षीय मोहम्मद सनूफ याच्यावर दहशतवादी हल्ल्याचे कथित समर्थन केल्याचा आरोप करण्यात आला. पोलिसांच्या माहितीनुसार, पहलगाम हल्ल्यात मृत्यू पावलेल्या एन. रामचंद्रन यांच्या मुलीने सोशल मीडियावर केलेल्या पोस्टवर सनूफने अशी टिप्पणी केली की, ती दहशतवादी हल्ल्याचे समर्थन करणारी होती. ही बाब निदर्शनास आल्यानंतर भारतीय जनता युवा मोर्चाच्या एका पदाधिकाऱ्याने पोलिसांकडे तक्रार दाखल केली. मोहम्मद सनूफने ती सोशल मीडिया टिप्पणी केली तेव्हा तो सौदी अरेबियामध्ये काम करत होता. त्यानंतर त्याच्याविरुद्ध केरळमध्ये गुन्हा दाखल झाला आणि त्याच्या विरोधात लूकआउट सर्क्युलर जारी करण्यात आले. जुलै २०२६ मध्ये तो सौदी अरेबियातून केरळमधील कोझिकोड (करीपूर) आंतरराष्ट्रीय विमानतळावर परतल्यानंतर इमिग्रेशन अधिकाऱ्यांनी त्याला ताब्यात घेतले. त्यानंतर त्याला संबंधित पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. प्राथमिक चौकशी आणि त्याच्या मोबाईलची तपासणी केल्यानंतर त्याच्यावर यूएपीए अंतर्गतही गुन्हा दाखल करण्यात आला.

यूएपीए हा भारतातील दहशतवाद आणि राष्ट्रविरोधी कारवायांवर नियंत्रण ठेवण्यासाठी लागू करण्यात आलेला कठोर कायदा आहे. या कायद्यांतर्गत तपासासाठी अधिक कालावधी उपलब्ध असतो आणि जामीन मिळवण्याच्या अटीही तुलनेने कठोर आहेत. मग खरे गद्दार कोण आहेत ? उद्धव ठाकरेंना कंटाळून तर त्यांचे धाकटे बंधू राज ठाकरेही गेले होते. शिंदेंनी शिवसेनेत बंड केल्यानंतर शिंदेंच्या सभेत उद्धव ठाकरेंचे सख्खे बंधू जयदेव ठाकरेही उपस्थित होते. त्यांनीही शिंदेंना पाठिंबा दिला. संजय राऊतांनी खऱ्या गद्दारांची ओळख करून घ्यायला हवी. खरे गद्दार मोहम्मद सनूफसारखे लोक आहेत. महाराष्ट्राचे गद्दार, देशाचे गद्दार हेच खरे गद्दार आहेत. ■

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**नीलेश जोशी**

# संकल्प सुरक्षित मातृत्वासाठीचा

समाजात विविध सामाजिक समस्या आहेत. चिंतन, चर्चा आणि जनजागृती करून या समस्यांचे निराकरण करणे शक्य आहे. यासाठीच विशेषत्वाने त्या-त्या समस्यांच्या समाधानाकरिता विचार व्हावा, हा हेतू ठेवून विशेष दिन साजरे केले जातात. जागतिक स्तरावर वाढती लोकसंख्या ही एक अशीच समस्या आहे. म्हणूनच ११ जुलै हा दिवस जागतिक लोकसंख्या दिन म्हणून पाळला जातो. मर्यादित संसाधने आणि अमर्याद वाढत असलेली लोकसंख्या याचे चिंतन आणि उपाययोजनांचा विचार या दिवशी मुख्यतः करण्यात येतो. तर २००५ सालापासून लोकसंख्या दिनाच्या आदल्या दिवशी म्हणजेच १० जुलै रोजी 'मातृ सुरक्षा दिन' साजरा करण्याची सुरुवात झाली. गर्भवती आणि होणाऱ्या मातांच्या आरोग्याची काळजी घेण्याबाबत समाजात जागरूकता निर्माण करणे हा या दिवसाचा उद्देश.

मातृत्व हा स्त्रीच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा आणि संवेदनशील टप्पा आहे. सुरक्षित गर्भधारणा, प्रसूती आणि प्रसूतीनंतरची योग्य काळजी हा प्रत्येक महिलेचा मूलभूत अधिकार आहे. १० जुलै हा दिवस केवळ जनजागृतीचा नाही, तर शासन, आरोग्य यंत्रणा आणि समाजाने सुरक्षित मातृत्वासाठी केलेल्या प्रयत्नांचा आढावा आणि भविष्यात आवश्यक असलेल्या उपाययोजनांच्या अंमलबजावणीचे नियोजन करण्याचा आहे. महाराष्ट्राने मातृ आरोग्याच्या क्षेत्रात देशात उल्लेखनीय प्रगती केली आहे. नमुना नोंदणी प्रणाली २०२१-२३ नुसार राज्याचा माता मृत्युदर प्रति एक लाख जन्मांमागे केवळ ३६ इतका आहे. देशात हाच दर सरासरी ८८ असताना महाराष्ट्राची कामगिरी राष्ट्रीय स्तरावर चांगली म्हणावी लागेल. मात्र या समस्येवर सर्वाधिक उत्तम कामगिरी केरळ, आंध्र प्रदेश आणि तामिळनाडू राज्यांनी केल्याचे आकडेवारीवरून दिसून येते. त्यानंतर महाराष्ट्राचा क्रमांक लागतो.



एका सर्वेक्षणानुसार २०२३ मध्ये महाराष्ट्राचा अर्भक मृत्युदर प्रति १,००० जन्मांमागे १४ इतका, तर नवजात मृत्युदर ११ आणि पाच वर्षांखालील बाल मृत्युदर १६ इतका आहे. ही सर्व आकडेवारी देशातील इतर राज्यांच्या आकडेवारीपेक्षा चांगली असली तरी अद्याप काही गंभीर आव्हाने समोर आहेतच. राज्यात अजूनही गर्भवती महिलांमधील रक्तक्षय अर्थात अॅनिमिया ही मोठी समस्या आहे. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणानुसार महाराष्ट्रातील १५ ते ४९ वर्षे वयोगटातील सुमारे ५४ ते ५५ टक्के महिला रक्तक्षयाने ग्रस्त आहेत. रक्तक्षयामुळे अकाली प्रसूती, कमी वजनाची बालके, प्रसूती दरम्यान अतिरक्तस्राव आणि मातामृत्यूचा धोका वाढतो. महाराष्ट्रात दरवर्षी लाखो महिलांची शासकीय रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये प्रसूती होते. बहुसंख्य प्रसूती रुग्णालयात होत असल्या तरी दुर्गम आदिवासी भागांमध्ये अद्याप तज्ज्ञ डॉक्टर, रक्तकेंद्र, आयसीयू, प्रसूतितज्ज्ञ आणि नवजात शिशू अतिदक्षता सुविधांचा अभाव जाणवतो. तर राज्यातील दुर्गम भागात अजूनही वाहतूक व आरोग्य सुविधा हे मोठे आव्हान आहे.

प्रसूतीदरम्यान होणारा अतिरक्तस्राव, उच्च रक्तदाब, गर्भधारणेतील विषबाधा, संसर्ग, रक्तक्षय आणि उपचारासाठी होणारा विलंब, ही मातामृत्यू होण्याची प्रमुख कारणे आहेत. प्रत्येक गर्भवती महिलेने पहिल्या तीन महिन्यांत गर्भधारणेची नोंदणी करणे, प्रसूतिपूर्व किमान चार तपासण्या करून घेणे, लोह-फॉलिक आम्लाच्या गोळ्या नियमित घेणे, संतुलित आहार घेणे, रुग्णालयात प्रसूती करणे आणि प्रसूतीनंतरही नियमित आरोग्य तपासणी करून घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्राने मातामृत्यू आणि बालमृत्यू कमी करण्यामध्ये उल्लेखनीय यश मिळवले असले, तरी 'उपचाराअभावी एकही माता दगावू नये' हे लक्ष्य साध्य करावे लागेल. मातृसुरक्षा हा केवळ आरोग्याचा विषय नाही तो महिला सक्षमीकरण, सामाजिक न्याय आणि मानवी विकासाचा पाया आहे. कोणत्याही आईचा मृत्यू हा केवळ त्या कुटुंबाचा नव्हे तर संपूर्ण समाजाचा तोटा असतो. त्यामुळे प्रत्येक गर्भवती महिलेला वेळेवर आरोग्यसेवा, योग्य पोषण आहार, सुरक्षित प्रसूती आणि प्रसूतीनंतरची काळजी मिळणे ही शासन आरोग्य यंत्रणा, कुटुंब आणि समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. मातृसुरक्षा दिनानिमित्ताने याचे चिंतन आणि अंमलबजावणीसाठी सर्वांनीच पुढाकार घ्यावा एवढेच. ■

९४२२८६२४८४

## मुंबई वार्तापत्र

# राजकीय सोयीचे 'रामनाम' !

**नागेश दाचेवार**

महाराष्ट्राच्या आणि देशाच्या राजकारणात सध्या एका अजब, तितक्याच हास्यास्पद आणि ढोंगी राजकीय प्रहसनाचा प्रयोग सुरू आहे. ज्या पक्षाने सातत्याने प्रभू श्रीरामाच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले, ज्या पक्षाच्या वकिलांनी आणि नेत्यांनी सर्वोच्च न्यायालयात प्रभू रामचंद्र हे केवळ एक 'काल्पनिक पात्र' होते असे अधिकृत शपथपत्र दिले, त्याच काँग्रेस पक्षाला आज अचानक रामाचा कळवळा आला आहे. तोच काँग्रेस पक्ष आज राजकीय सोयीचे रामनाम करत, राम मंदिरातील कथित अपहाराच्या विरोधात 'रघुपती राघव राजाराम' भजन आंदोलन करायला रस्त्यावर उतरला आहे. राजकारणात सोयीस्कर भूमिका घेणे ही काही नवीन गोष्ट नाही, परंतु ढोंगीपणाचा जेव्हा कळस होतो, तेव्हा त्याचे रूपांतर एका अत्यंत विनोदी हास्यजत्रेत होते. काँग्रेसचे हे आंदोलन म्हणजे त्याच हास्यजत्रेचा एक ढळढळीत नमुना आहे.

विद्वान आणि सुज्ञ मतदारांनी या आंदोलनाकडे पाहिले की एकच प्रश्न मनात येतो. कालपर्यंत ज्यांना रामलल्लाचे मंदिर हे अंधश्रद्धेचे किंवा राजकारणाचे केंद्र वाटत होते, ज्यांनी अयोध्येतील भव्य राम मंदिर उद्घाटनाच्या ऐतिहासिक सोहळ्याचे निमंत्रण अत्यंत अहंकाराने आणि अधिकृत पत्रक काढून नाकारले, त्यांना अचानक प्रभू श्रीरामाची आठवण कशी झाली? याचे उत्तर सरळ आहे. ही रामभक्ती नाही, हा प्रभू रामाविषयीचा आदर नाही, तर ही आगामी निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून उरलेली राजकीय अब्रू वाचवण्यासाठी चाललेली केविलवाणी धडपड आहे. काँग्रेसच्या या आंदोलनाचा बुरखा टराटरा फाडण्यासाठी आपल्याला फार मागे जाण्याची गरज नाही. २००७ मधील 'सेतू समुद्रम' प्रकल्पाची घटना संपूर्ण देशाने पाहिली आहे. तत्कालीन काँग्रेस प्रणीत यूपीए सरकारने सर्वोच्च न्यायालयात एक प्रतिज्ञापत्र सादर केले होते. या शपथपत्रात एएसआय (भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण) च्या माध्यमातून काँग्रेस सरकारने अधिकृतपणे नोंदवले होते की, प्रभू श्रीराम नावाचे कोणतेही ऐतिहासिक व्यक्तिमत्त्व अस्तित्वात नव्हते. रामायण हा केवळ एक काल्पनिक ग्रंथ असून, रामसेतू ही मानवनिर्मित वास्तू नसून केवळ एक नैसर्गिक रचना आहे.

ज्या पक्षाने देशातील करोडो हिंदूंच्या आराध्य दैवताला, त्यांच्या आस्थेला आणि अस्तित्वालाच कायदेशीर कागदपत्रांवर 'काल्पनिक' ठरवले, तो पक्ष आज राम मंदिराच्या रक्षकाची भूमिका वठवत आहे, यासारखा दुसरा मोठा विनोद नाही. जर तुमच्या मते प्रभू रामचंद्र हे काल्पनिक पात्र आहेत, तर मग एका काल्पनिक पात्राच्या मंदिरामध्ये झालेल्या कथित अपहारावरून तुम्ही आंदोलन कसे करू शकता ? जर रामच नव्हते, तर मंदिर कोणाचे ? आणि जर मंदिर तुमचे श्रद्धास्थान नाही, तर मग हे भजनाचे ढोंग कशासाठी ?

जानेवारी २०२४ मध्ये जेव्हा संपूर्ण जग अयोध्येतील प्रभू श्रीरामाच्या भव्य प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे साक्षीदार होत होते, तेव्हा संपूर्ण देशात दिवाळी साजरी केली जात होती. अनेक दशकांच्या संघर्षानंतर, हजारो कारसेवकांच्या बलिदानानंतर आणि कायदेशीर लढाईनंतर रामलल्ला आपल्या मूळ स्थानी विराजमान होत होते. हा सोहळा कोणत्याही एका पक्षाचा नव्हता, तो संपूर्ण भारताचा, प्रत्येक रामभक्ताचा सोहळा होता. श्री रामजन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टने अत्यंत आदराने काँग्रेसच्या सर्वोच्च नेत्यांना या सोहळ्याचे अधिकृत निमंत्रण दिले होते. परंतु, तत्कालीन राजकीय समीकरणांमुळे, विशिष्ट मतपेढी नाराज होईल या भीतीने आणि हिंदूविरोधी मानसिकतेच्या अहंकारातून काँग्रेसने ते निमंत्रण अत्यंत उद्धटपणे नाकारले. हा भाजपचा कार्यक्रम आहे, हा राजकीय सोहळा आहे, अशी अत्यंत बाळबोध कारणे देत काँग्रेस नेत्यांनी अयोध्येकडे पाठ फिरवली. महात्मा गांधींनी ज्या 'रघुपती राघव राजाराम' धून आणि भजनाचा वापर देशात एकात्मता, सत्य आणि अहिंसेचा संदेश देण्यासाठी केला, त्याच भजनाचा वापर आज काँग्रेस पक्ष आपल्या पोकळ आणि ढोंगी आंदोलनासाठी करत आहे. हे प्रभू रामाचे भजन नसून, स्वतःच्या पापांचे क्षालन करण्यासाठी आणि जनतेच्या डोळ्यात धूळ फेकण्यासाठी रचलेला हा एक राजकीय फार्स आहे.

सभागृहामध्ये किंवा टीव्ही स्टुडिओमध्ये बसून प्रभू रामाच्या अस्तित्वावर चिखलफेक करायची, रामभक्तांना हिणवायचे, राम मंदिराच्या उभारणीत कायदेशीर आणि प्रशासकीय अडचणी निर्माण करायच्या आणि जेव्हा जनतेचा रोष समोर येतो, तेव्हा हातात टाळ घेऊन 'रघुपती राघव' म्हणायचे, हा ढोंगीपणाचा पराकोटीचा कळस आहे. जनतेला हे स्पष्टपणे दिसत आहे की, काँग्रेसच्या नेत्यांच्या ओठांवर जरी 'राजाराम' असले, तरी त्यांच्या मनात केवळ 'मतराम' आहे. हे आंदोलन म्हणजे भक्ती नसून, शुद्ध राजकीय नौटंकी आणि हास्यजत्रेचा प्रकार आहे. महाराष्ट्राच्या संदर्भात बोलायचे झाले तर, काँग्रेसच्या या ढोंगी आंदोलनाला 'उबाठा' गटाची साथ मिळणे किंवा त्यांच्या विचारसरणीची सावली पडणे यात आश्चर्य काहीच नाही. ज्यांनी स्वतः सत्तेसाठी हिंदुत्व गहाण ठेवले, त्यांच्यासोबत राहून काँग्रेसलाही आता 'सॉफ्ट हिंदुत्वा'चा पुळका आला आहे. परंतु, अस्सल आणि कल्पित यातला फरक जनतेला चांगलाच ठावूक असतो.

एकीकडे मुंबईत आणि महाराष्ट्रात 'गद्दारी' आणि 'खोके' या शब्दांचा पोपटपंचाळ करायचा आणि दुसरीकडे अयोध्येच्या मंदिरावर हक्क सांगायचा ? काँग्रेसने आजवर नेहमीच तुष्टीकरणाचे राजकारण केले. एका विशिष्ट वर्गाची मते मिळवण्यासाठी त्यांनी बहुसंख्य हिंदू समाजाच्या भावनांना नेहमीच पायदळी तुडवले. आज जेव्हा त्यांना जाणीव झाली आहे की, प्रभू रामाशिवाय या देशात गत्यंतर नाही, तेव्हा त्यांनी हे भजनाचे सोंग घेतले आहे. परंतु, वाघाचे कातडे पांघरल्याने कोणी वाघ होत नाही, तसेच हातात टाळ घेतल्याने रामद्रोही हे रामभक्त होऊ शकत नाहीत.

इतिहास साक्षी आहे की, ज्यांनी ज्यांनी प्रभू श्रीरामाचा अवमान केला, त्यांचे राजकीय आणि सामाजिक अस्तित्व या देशातून संपुष्टात आले. काँग्रेस पक्षाची आज जी दुरवस्था झाली आहे, ती त्यांच्या याच कर्मांचे फळ आहे. ज्या पक्षाने या देशावर साठ वर्षे राज्य केले, तो पक्ष आज काही जागांसाठी प्रादेशिक पक्षांच्या दारात लाचार होऊन उभा आहे. काँग्रेसचे हे आंदोलन म्हणजे राजकीय पटलावरील एक शुद्ध हास्यजत्रा आहे. ज्याप्रमाणे जत्रेत सोंग घेऊन आलेला बहुरूपी लोकांना हसवण्याचे काम करतो, त्याचप्रमाणे काँग्रेसचे नेते हातात टाळ-मृदंग घेऊन जनतेचे मनोरंजन करत आहेत. जनतेला त्यांच्या या ढोंगीपणाची पूर्ण जाणीव आहे. प्रभू श्रीराम हे सत्य आहेत, ते सनातन आहेत आणि ते या देशाचा आत्मा आहेत. त्यांच्या नावाचा वापर केवळ राजकीय पोळी भाजण्यासाठी करणाऱ्यांना जनता कधीही माफ करणार नाही. काँग्रेसने कितीही आंदोलनांचे नाटक केले, कितीही भजनांचे सोंग घेतले, तरी त्यांचा रामविरोधी इतिहास पुसला जाऊ शकत नाही. नियतीने त्यांना त्यांच्या कर्मांची चपराक दिली आहे आणि आगामी काळातही जनता त्यांच्या या दुटप्पी आणि ढोंगी राजकारणाला त्याची योग्य जागा दाखवून दिल्याशिवाय राहणार नाही, हेच सत्य आहे. ■

९२७०३३३८८६

## वाचक पत्रे

### निवडणूक आयोगाने खुलासा करावा

एसआयआरच्या अंतर्गत मतदार नोंदणीची कामे पिंपरी-चिंचवड शहरात विविध शाळा आणि मतदान केंद्रांवर सुरू झाली आहेत. मात्र याबाबत संबंधित सरकारी यंत्रणांकडून कोणताही अधिकृत खुलासा केला गेला नसल्याने बऱ्याच नागरिकांना याची कल्पना नाही. बीएलओ आपल्या घरी येऊन नोंदणी करतील असे आधी सांगण्यात येत होते. मात्र पाऊस आणि प्रतिनिधींकडील हजारो छापील फॉर्म्स घरोघरी नेणे शक्य नसल्यामुळे मतदारांनीच आवश्यक कागदपत्रे घेऊन आपापल्या मतदान केंद्रावर जाऊन नोंदणी करावी असे तेथील नोंदणी अधिकारी सांगत आहेत. त्यांनी दिलेली कारणेही पटण्यासारखी असल्यामुळे त्याबद्दल वाद नाही, पण संबंधित यंत्रणांनी आणि प्रसारमाध्यमांनी याबाबत वर्तमानपत्रे, टेलिव्हिजन आणि आकाशवाणीद्वारे बातम्या/जाहिराती/प्रकटने देऊन खुलासा केला तर या अतिमहत्त्वाच्या कामाची पूर्तता करण्यासाठी मतदारांना मदत होईल. यासाठी आधारकार्ड झेरॉक्स, आपला फोटो बदलायचा असेल तर दोन फोटो आणि ऑनलाईन यादीत आपले नाव सहज शोधण्यासाठी आपला एपिक नंबर असणे आवश्यक आहे, अशी महत्त्वाची माहितीही केंद्रावरील बीएलओ देत आहेत.

**शिवराम वैद्य**/पुणे. ९८५०५१८०१८

■■■

### गगनचुंबी इमारती बांधताना नियमांचे उल्लंघन

दि. ९ जुलैच्या तरुण भारतात आलेल्या बातमीनुसार सत्ता पक्षाच्या प्रस्तावावर बोलताना आ. प्रवीण दटके यांनी नागपूरमधील गगनचुंबी इमारतींमधील अनियमितता मांडली. नागपूर मनपा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात निवासी आणि व्यावसायिक गगनचुंबी इमारतींचे बांधकाम सुरू आहे. यात यूडीसीपीआर, एफएसआय नियम, सेट बॅक, खुल्या जागा, पार्किंग, अग्निसुरक्षा यांचे उल्लंघन होत आहे. आकर्षक जाहिराती आणि खोटी आश्वासनानी नागरिकांची फसवणूक होते. जाहिरातीतील दाखवलेल्या सुविधा प्रत्यक्षात मिळत नाहीत. इमारत पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र (ओसी) घेताना मोठ्या विकास कामांना नियम डालवून सवलत दिली जाते, असा आरोप दटके यांनी केला आहे. गगनचुंबी इमारतीमुळे पाणीपुरवठा, मलनिस्सारण, वीज, वाहतूक आणि अग्निसुरक्षा यंत्रणावर ताण वाढला आहे. परवानगी देताना नियमांची अंमलबजावणी होते का याची तपासणी व्हावी. विनापरवानगी देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी त्यांनी केली. नागपुरात व विशेषतः लक्ष्मीनगरमध्ये बऱ्याच गगनचुंबी इमारतींचे काम सुरू आहे. मनपाच्या नियमांनप्रमाणे अग्निसुरक्षेसाठी भूखंडाच्या चारही बाजूंना जास्त जागा सोडावी लागत असल्यामुळे या गगनचुंबी इमारती बांधण्यात येत आहे असे दिसते. कंत्राटदाराच्या दृष्टीने इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असे ते म्हणत असतील तरी पण मनपाकडून या इमारतीची ओसी घेणे आवश्यक आहे. इमारतीची ओसी मिळवण्याची प्रक्रिया अतिशय क्लिष्ट असून बराच कालावधी लागतो व त्यामुळे फ्लॅट विकत घेणाऱ्या लोकांना नवीन फ्लॅटमध्ये स्थानांतर होणे कठीण जात आहे. सबब, मनपाने सध्या पूर्ण होत आलेल्या इमारतींना लवकरात लवकर ओसी द्यावी, असे वाटते.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

■■■

### निसर्गाचा लहरीपणा की मानवी नियोजनाचा अभाव ?

आज संपूर्ण महाराष्ट्र आणि देशातील अनेक शहरे एका विचित्र संकटाचा सामना करत आहेत. काही दिवसांपूर्वीच आपण भीषण पाणीटंचाईच्या झळा सोसत होतो. पावसाची वाट पाहताना तहानलेल्या जमिनीकडे डोळे लावून बसलेलो होतो. मात्र, पावसाचे आगमन होताच परिस्थिती एका टोकाकडून दुसऱ्या टोकाला पोहोचली आहे. आज सर्वत्र अतिवृष्टीमुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. या भीषण परिस्थितीकडे पाहताना एक प्रश्न प्रकर्षाने उपस्थित होतो—हा निसर्गाचा कोप आहे की आपल्या नियोजनाचा अभाव ? शहरांमध्ये काँक्रीटीकरण इतक्या मोठ्या प्रमाणावर झाले आहे की, पावसाचे पाणी जमिनीत जिरण्यास जागाच उरलेली नाही. पाण्याचा नैसर्गिक निचरा होणारे ओढे, नाले आज अतिक्रमणांच्या विळख्यात अडकले आहेत. परिणामी, थोडा पाऊस पडला तरी शहरांचे रूपांतर तलावात होते. दुसरी धक्कादायक बाब म्हणजे, इतकी अतिवृष्टी होऊनही अनेक धरणे अजूनही पूर्णपणे भरलेली नाहीत. याचे मुख्य कारण म्हणजे आपण पावसाचे पाणी साठवण्याचे, ते जमिनीत जिरवण्याचे कोणतेही ठोस तंत्रज्ञान विकसित केलेले नाही. पावसाचे पाणी नदी-नाल्यांवाटे थेट समुद्राला जाऊन मिळते आणि आपण मात्र पुढील उन्हाळ्यातील पाणीटंचाईच्या चिंतेत असतो. पाऊस पडतो तेव्हा तो साठवून ठेवणे, भूजल पातळी वाढवणे यासाठी कोणतेही नियोजन नाही. आज शहरांमधील 'रेन वॉटर हार्वेस्टिंग' ही केवळ एक कायदेशीर अट राहिली आहे, तिचा प्रत्यक्ष वापर नगण्य आहे. ग्रामीण भागात ठिकठिकाणी लहान बंधारे बांधून आणि शहरांमध्ये पावसाचे पाणी जमिनीत जिरवण्यासाठी 'शोषखड्डे' तयार करून आपण पाणी अडवू शकतो. पाणी जिरू शकेल अशा तंत्रज्ञानाचा वापर करणे ही काळाची गरज आहे. ■

**वर्षा आवदे**/नागपूर

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

CMYK

धाराशिव •
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## तुळजाभवानी मंदिरात दिव्यांग व ज्येष्ठांसाठी मोफत खुर्ची सेवा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ जुलै -**

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानाने दर्शनासाठी चालत जाण्यास अडचण असलेल्या दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक तसेच अतिवृद्ध भाविकांच्या सोयीसाठी मंदिर प्रशासकीय कार्यालयातून मोफत डोली व खुर्ची सेवा सुरू केली आहे.



दर्शनासाठी पायी चालणे शक्य नसलेल्या भाविकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंदिर प्रशासनाने केले आहे. ही सेवा पूर्णपणे निःशुल्क असून, आवश्यकतेनुसार भाविकांना मार्गदर्शन व सहाय्यही केले जात आहे.

या सेवेचा लाभ घेण्यासाठी भाविकांनी मंदिर प्रशासकीय कार्यालय किंवा मंदिर कर्मचाऱ्यांशी संपर्क साधावा. प्रत्येक भाविकाला सुरक्षित, सुलभ व सुखकर दर्शनाचा अनुभव मिळावा, यासाठी मंदिर संस्थान सातत्याने विविध सुविधा उपलब्ध करून देत असल्याचे प्रशासनाने सांगितले आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### कै. चव्हाण स्मृतिदिनानिमित्त विद्यार्थ्यांना स्पोर्ट्स किट वाटप

**धाराशिव, दि.११ जुलै -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे कै. अविनाश भाऊ चव्हाण यांच्या स्मृतिदिनानिमित्त संभाजीनगरचे उद्योजक रणजीत भैय्या चव्हाण यांच्या वतीने विद्यालयातील खेळाडूंना स्पोर्ट्स किटचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. आंबेडकर बालविकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुभाषदादा कोळगे होते. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना स्पोर्ट्स किटचे वितरण करण्यात आले. प्राचार्य जयप्रकाश कोळगे यांनी या स्पोर्ट्स किटमुळे ग्रामीण भागातील खेळाडूंना जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावर प्रगतीची संधी मिळेल, असे सांगितले. अध्यक्षीय भाषणात सुभाषदादा कोळगे यांनी विद्यार्थ्यांनी मेहनत, शिस्त आणि सातत्याच्या बळावर यश संपादन करावे, असे आवाहन केले. कार्यक्रमास संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन सचिन कांबळे यांनी, तर आभार गणेश शेटे यांनी मानले.

### दीपक घोडके यांची भाजप ओबीसी मोर्चा जिल्हा उपाध्यक्षपदी निवड

**अणदूर, दि.११ जुलै -**

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते तथा सामाजिक कार्यकर्ते दीपकदादा घोडके यांची भाजप ओबीसी मोर्चाच्या धाराशिव जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हाध्यक्ष विजय शिंगाडे यांनी १० जुलै रोजी त्यांना नियुक्तीपत्र प्रदान केले. घोडके यांनी अनेक वर्षे अणदूर शहर भाजप अध्यक्ष म्हणून काम करत पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी योगदान दिले आहे. विधानसभा, जिल्हा परिषद, पंचायत समिती व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये पक्षाच्या यशासाठी त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. घोडके यांच्या निवडीबद्दल युवा नेते सुनील चव्हाण, जिल्हा सरचिटणीस साहेबराव घुगे, दीपक आलूरे, धनराज मुळे, अप्पू धमुरे, प्रवीण घोडके, निलेश आलूरे, अंकुश चीनकारे, बालाजी कुलकर्णी, गुंडेशा गोवे, दीपक घुगे, विक्रांत दूधाळकर सह कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला.





### ज्ञानप्रसार विद्यालय, मोहा येथे १०० विद्यार्थ्यांना स्कूल किटचे वाटप

**कळंब, दि.११ जुलै -**

ज्ञान प्रसारक मंडळ, येरमाळा संचलित ज्ञानप्रसार विद्यालय, मोहा येथे 'एक हात मदतीचा' उपक्रमांतर्गत ग्रामशक्ती वेल्फेअर फाउंडेशन, अंबाजोगाई व सेवा सहयोग फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने गरीब व गरजू १०० विद्यार्थ्यांना स्कूल किटचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक तथा प्राचार्य अविनाश मोरे होते. प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे ज्येष्ठ संचालक तात्यासाहेब पाटील, प्रशासकीय अधिकारी रमेशभाऊ मोहेकर, पर्यवेक्षक सतीश कानगुडे तसेच ग्रामशक्ती वेल्फेअर फाउंडेशनचे अध्यक्ष ज्योतीराम सोनके उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय बॅग, वह्या, कंपास, टिफिन बॉक्स, पाण्याची बाटली, विचारवंतांचे पुस्तक आदी शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमास शिक्षक, पालक, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. शेखर गिरी यांनी, तर आभार सतीश मडके यांनी मानले.

# पाणीप्रश्नावर राजेनिंबाळकरांची शिंदेंशी चर्चा; ७ टीएमसी योजनेला चालना

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ जुलै -**

धाराशिव लोकसभा मतदारसंघाचे खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी मुंबईतील नंदनवन येथे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सदिच्छा भेट घेऊन धाराशिव जिल्ह्यातील विविध प्रलंबित प्रश्नांसह जनहिताच्या मागण्यांचे निवेदन सादर केले. यामध्ये कृष्णा-मराठवाडा सिंचन प्रकल्पांतर्गत धाराशिव जिल्ह्यास ७ टीएमसी पाणीपुरवठा योजनेसाठी भरीव आर्थिक तरतूद करण्याची प्रमुख मागणी करण्यात आली.

खासदार राजेनिंबाळकर यांनी निवेदनात नमूद केले की, धाराशिव हा केंद्र शासनाच्या आकांक्षी जिल्ह्यांच्या यादीतील जिल्हा असून, सातत्याने दुष्काळ व पाणीटंचाईचा सामना करत आहे. शेती, पिण्याचे पाणी, उद्योग आणि जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी कायमस्वरूपी जलस्रोत उपलब्ध होणे अत्यावश्यक आहे.

**उपमुख्यमंत्री शिंदेंकडून तातडीच्या बैठकीचे निर्देश**

कृष्णा-मराठवाडा सिंचन प्रकल्पांतर्गत धाराशिवला ७ टीएमसी पाणी उपलब्ध करून देण्याच्या योजनेसाठी सुमारे ५,००० कोटींच्या निधीची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

यासाठी या योजनेचा राष्ट्रीय प्रकल्प म्हणून समावेश करून केंद्र शासनाच्या आर्थिक सहकार्याने आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा आणि प्रकल्प युद्धपातळीवर पूर्ण करावा, अशी मागणीही त्यांनी उपमुख्यमंत्र्यांकडे केली. या योजनेमुळे धाराशिवला कायमस्वरूपी ७ टीएमसी पाण्याचा स्रोत उपलब्ध होईल, हजारो हेक्टर शेती सिंचनाखाली येईल, कृषी उत्पादनात वाढ होईल, दुष्काळ व पाणीटंचाईवर प्रभावी उपाय होईल, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल, ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची समस्या कमी होईल, भूजल पातळीत सुधारणा होईल, उद्योगांना चालना मिळेल, रोजगारनिर्मिती वाढेल तसेच ग्रामीण भागातून होणारे स्थलांतर कमी होऊन जिल्ह्याच्या सामाजिक, आर्थिक आणि औद्योगिक विकासाला गती मिळेल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.



धाराशिवच्या पाणीप्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन राज्य शासनाने केंद्र शासनाशी समन्वय साधून या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी आवश्यक निधीची तातडीने तरतूद करावी, अशी आग्रही मागणी खासदार राजेनिंबाळकर यांनी केली.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी धाराशिवच्या पाणीप्रश्नाची दखल घेत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना तातडीने बैठक आयोजित करण्याच्या सूचना दिल्या.

तसेच ७ टीएमसी पाणीपुरवठा योजना आणि कृष्णा-मराठवाडा सिंचन प्रकल्पाचा सविस्तर आढावा घेऊन आवश्यक कार्यवाही करण्याबाबत सकारात्मक भूमिका व्यक्त केली.

## एका शिक्षिकेवर ५५ विद्यार्थ्यांची जबाबदारी; पालकांनी शाळेला ठोकले टाळे



**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.११ जुलै -**

वाशी तालुक्यातील पिंपळगाव कमळेश्वर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षकांच्या तीव्र कमतरतेविरोधात संतप्त पालकांनी शुक्रवारी (दि. १०) शाळेला टाळे ठोकून आंदोलन केले. या आंदोलनाची गंभीर दखल घेत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर यांनी शाळेला तातडीने भेट देत परिस्थितीची पाहणी केली. यावेळी त्यांनी आठ दिवसांच्या आत कायमस्वरूपी शिक्षकांची नियुक्ती करण्यासह शाळेच्या जीर्ण इमारतीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.

पिंपळगाव कमळेश्वर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सध्या ५५ विद्यार्थी शिक्षण घेत असून, गेल्या दोन वर्षांपासून संपूर्ण शाळेची जबाबदारी केवळ एका शिक्षिकेवर आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होत असल्याची तक्रार पालकांनी वारंवार संबंधित विभागाकडे केली होती. मात्र, अनेक निवेदने देऊनही अतिरिक्त शिक्षकांची

**सीईओंच्या आश्वासनानंतर मार्ग मोकळा...**

नियुक्ती न झाल्याने अखेर पालकांनी शाळेला टाळे ठोकून आंदोलनाचा मार्ग स्वीकारला.

शिक्षकांच्या कमतरतेबरोबरच शाळेची इमारतही जीर्णावस्थेत असून, पावसाळ्यात वर्गखोल्यांमध्ये पाणी गळत असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच शाळा परिसरातील अस्वच्छतेमुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याबाबतही पालकांनी तीव्र चिंता व्यक्त केली.

आंदोलनाची माहिती मिळताच मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर यांनी शाळेला भेट देऊन पालक, ग्रामस्थ आणि संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

त्यांनी पालकांना उद्यापासून शाळा नियमित सुरू करण्याचे आवाहन करत आठ दिवसांत कायमस्वरूपी शिक्षक उपलब्ध करून देण्याबरोबरच शाळेच्या इमारतीसाठी आवश्यक निधी मंजूर करण्याची प्रक्रिया तातडीने सुरू करण्यात येईल, असे स्पष्ट केले.

**सातत्याने पाठपुरावा केला : सविता तळेकर**

जिल्हा परिषद सदस्या सविता विकास तळेकर (पारगाव गट) यांनी सांगितले की, पिंपळगाव कमळेश्वर शाळेत शिक्षक नियुक्तीसाठी गेल्या दोन महिन्यांपासून सातत्याने पाठपुरावा सुरू होता. मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर तालुक्यात येणार असल्याची माहिती मिळताच त्यांना शाळेला भेट देण्याची विनंती केली. त्यांनी शाळेची पाहणी करून ग्रामस्थांशी संवाद साधला आणि आठ दिवसांत कायमस्वरूपी शिक्षक उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. तसेच शाळेच्या इमारतीच्या प्रश्नावरही तातडीने कार्यवाही करण्याचे सांगितले.

## नळदुर्ग-अक्कलकोट रस्ता प्रकरणी १५ जुलैला अन्नत्याग

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ जुलै -**

राष्ट्रीय महामार्ग क्र. ६५२ अंतर्गत नळदुर्ग-अक्कलकोट रस्ता प्रकरणात बाधित शेतकऱ्यांवर अन्याय होत असल्याचा आरोप करत शेतकरी संघर्ष समितीने १५ जुलै रोजी सकाळी १० वाजता नळदुर्ग पोलीस ठाण्यासमोर सहकुटुंब अन्नत्याग आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

समितीने दिलेल्या निवेदनात मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाच्या आदेशाचा अवमान करून पोलिस बंदोबस्तात वारंवार जमिनीची मोजणी केली जात असून त्यामुळे

**आंदोलनाचा इशारा**

बाधित शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

शेतकऱ्यांना विश्वासात न घेता संबंधित अधिकारी कारवाई करत असल्याचाही दावा निवेदनात करण्यात आला आहे.

या निवेदनावर शेतकरी संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष सरदारसिंग ठाकूर, जिल्हा समन्वयक दिलीप जोशी, तालुका अध्यक्ष व्यंकट पाटील यांच्यासह विविध पदाधिकारी व शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या असून, निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, मुख्य सचिव, महसूल मंत्री, पालकमंत्री व विभागीय आयुक्त यांनाही पाठविण्यात आल्या आहेत.

### मद्यधुंद अवस्थेत वाहन चालविल्याप्रकरणी चालकावर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ जुलै -**

मद्यधुंद अवस्थेत चारचाकी वाहन चालविल्याप्रकरणी आनंदनगर पोलीस ठाण्यात एका वाहनचालकाविरुद्ध मोटार वाहन कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत माहिती अशी की, दत्तात्रय शिवाजी आवाड (रा. आंबेहोळ, ता. जि. धाराशिव) हे १० जुलै रोजी बसस्थानकाच्या प्रवेशद्वारासमोरील रस्त्यावर एमएच-२५-एव्ही-६८९४ क्रमांकाचे वाहन मद्यधुंद अवस्थेत चालवित असल्याचे आढळून आले.

### लोहाऱ्यात 'माझे गाव आरोग्य संपन्न गाव' अभियानाचा आढावा

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.११ जुलै -**

तालुकास्तरीय 'माझे गाव आरोग्यसंपन्न गाव' या राज्यस्तरीय अभियानाची मासिक आढावा बैठक १० जुलै रोजी पंचायत समितीच्या सभागृहात गटविकास अधिकारी ओंकार गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

बैठकीत तालुक्यातील सर्व गावांमध्ये आरोग्यविषयक अभियानांतर्गत सुरू असलेल्या कामांचा आढावा घेण्यात आला. गावपातळीवर स्वच्छता व नाविन्यपूर्ण उपक्रम प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना संबंधित आरोग्य अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

**योजना प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना...**

यावेळी वैद्यकीय अधीक्षक डॉ. रविंद्र पांडे, तालुका आरोग्य अधिकारी तथा सचिव डॉ. धीरज सोमवंशी, विविध विभागांचे अधिकारी, पंचायत समितीचे पदाधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी तसेच पत्रकार संघाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## प्रा. रवी सुरवसे यांना पीएचडी पदवी प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ जुलै -**

छत्रपती शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय, धाराशिव येथील मराठी विषयाचे प्राध्यापक प्रा. रवी सुरवसे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची पीएचडी (विद्यावाचस्पती) पदवी प्रदान करण्यात आली आहे.

प्रा. सुरवसे यांनी आंबेडकरी विचारातून निर्माण झालेल्या मराठवाड्यातील निवडक मराठी साहित्याचा अभ्यास या विषयावर प्रा. डॉ. मनोहर सिरसाट यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन पूर्ण केले. त्यांच्या अंतिम मौखिक परीक्षेसाठी प्रा.डॉ. संदीप सांगळे हे बाह्य परीक्षक, तर प्रा डॉ. विनोद राठोड यांनी अध्यक्ष म्हणून काम पाहिले.



या उल्लेखनीय यशाबद्दल राजर्षी शाहू शिक्षण प्रसारक मंडळाचे पदाधिकारी, महाविद्यालयाचे शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी तसेच विविध सामाजिक संघटनांनी प्रा. रवी सुरवसे यांचे अभिनंदन केले आहे.

## पावसाची हुलकावणी; नळदुर्ग परिसरात खरीप पीक धोक्यात

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.११ जुलै -**

नळदुर्ग आणि परिसरात पावसाने अद्यापही समाधानकारक हजेरी लावलेली नसल्याने खरीप हंगाम संकटात सापडला आहे. अनेक शेतकऱ्यांची पेरणी अद्यापही रखडली असून, ज्यांनी सुरुवातीच्या रिमझिम पावसाच्या भरोशावर सोयाबीनची पेरणी केली होती, त्यांच्यासमोर आता दुबार पेरणीचे संकट उभे ठाकले आहे.

यंदाच्या पावसाळ्याला सुरुवात होऊन महिन्याहून अधिक काळ उलटला असला तरी नळदुर्ग परिसरातील गावांमध्ये एकही दमदार पाऊस झालेला नाही. त्यामुळे अनेक शेतकरी अजूनही पावसाच्या प्रतीक्षेत असून खरीपाची पेरणीच करू शकलेले नाहीत. परिणामी, यंदाचा खरीप हंगाम वाया जाण्याची भीती व्यक्त होत आहे.

गेल्या काही दिवसांपासून परिसरात काळे ढग दाटून येत असले तरी ते वाऱ्यासोबत पुढे निघून जात आहेत. मागील दोन-तीन दिवसांपासून तर ढगही



दिसेनासे झाले असून केवळ कोरडे वारे वाहत आहेत. त्यामुळे जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी होत असून उगवलेले सोयाबीन वाळण्याच्या मार्गावर आहे.

सुरुवातीच्या रिमझिम पावसावर

**शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट...**

विश्वास ठेवून काही शेतकऱ्यांनी महागडे बियाणे खरेदी करून पेरणी केली होती. सोयाबीनची उगवणही चांगली झाली; मात्र पुढील पाऊस न झाल्याने ही पिके जळून जाण्याची भीती निर्माण झाली आहे. दुसरीकडे, अनेक शेतकऱ्यांनी बियाणे आणि खते खरेदी करून घरी ठेवली असून तेही पावसाची आतुरतेने वाट पाहत आहेत. पावसाचा हा खंड कायम राहिल्यास नळदुर्ग परिसरात तीव्र पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. नळदुर्गच्या बोरी धरणातही अत्यल्प पाणीसाठा शिल्लक असल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

पावसाअभावी केवळ शेतीच नव्हे तर स्थानिक अर्थचक्रावरही परिणाम दिसून येत आहे. शेतकऱ्यांच्या हातात पैसा नसल्याने बाजारपेठांमध्येही अपेक्षित गर्दी दिसत नाही. त्यामुळे शेतकरी, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिक चांगल्या पावसासाठी प्रार्थना करत असून, येत्या काही दिवसांत वरुणराजा बरसावा, अशी सर्वांची अपेक्षा आहे.

## आर. पी. कॉलेज ऑफ फार्मसीत पदवीदान समारंभ संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ जुलै -**

डॉ. व्ही. पी. एज्युकेशनल कॅम्पस अंतर्गत आर. पी. कॉलेज ऑफ फार्मसी, धाराशिव येथे पदवीदान समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी पदवीधर विद्यार्थ्यांना उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत नैतिक मूल्यांचे पालन आणि रुग्णसेवेला सर्वोच्च प्राधान्य देण्याचा संदेश मान्यवरांनी दिला.

कार्यक्रमाला संस्थेचे विश्वस्त डॉ. प्रतापसिंहजी पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच डॉ. वीणा पाटील, डीन, शासकीय आयुर्वेदिक वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव यांची



प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेख गाझी होते.

प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. शेख गाझी यांनी पदवीधर विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी ज्ञान, कौशल्य आणि सेवाभावाच्या बळावर महाविद्यालयाचे नाव देश-विदेशात उज्ज्वल करावे,

**विद्यार्थ्यांना नैतिकतेसह रुग्णसेवेचा संदेश...**

अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

प्रमुख अतिथी डॉ. प्रतापसिंहजी पाटील यांनी फार्मसी व्यवसायातील नैतिक मूल्यांचे जतन करत रुग्णसेवेला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे आवाहन केले. तर डॉ. वीणा पाटील यांनी विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणे ज्ञानार्जन करून समाजसेवा, संशोधन आणि आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय योगदान द्यावे, असे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. विजय सुतार होते. सूत्रसंचालन प्रा. अबोली निरवणे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. गणेश मते यांनी मानले. समारंभास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

### धोंडाबाई बोडके यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.११ जुलै -**

लोहारा तालुक्यातील वडगाववाडी येथील गणपती बोडके गुरुजी यांच्या पत्नी कै. धोंडाबाई गणपती बोडके (वय ६३) यांचे १० जुलै २०२६ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.



त्यांच्यावर ११ जुलै रोजी सकाळी १० वाजता गावातील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, नातवंडे असा परिवार आहे.

त्यांच्या निधनाने वडगाववाडी परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत ९२ विद्यार्थ्यांची टुडी-इको तपासणी

## १८ विद्यार्थ्यांची ऱ्हदय शस्त्रक्रियेसाठी निवड



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ जुलै**

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (आरबीएसके) अंतर्गत ० ते १८ वर्षे वयोगटातील संशयित हृदयविकारग्रस्त विद्यार्थ्यांसाठी जिल्हा रुग्णालय, हिंगोली येथे आज टुडी-इको तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात जिल्ह्यातील ९२ विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली असून त्यापैकी १८ विद्यार्थ्यांची मोफत हृदयशस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली आहे.

हे शिबिर मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नितीन तडस आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. चक्रधर मुंगल यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. ही तपासणी ठाणे येथील केआयएमएस हॉस्पिटलचे बालहृदयरोग तज्ज्ञ डॉ. श्रीनिवास एल., तसेच विजय खरात व उल्हास पाटील यांनी केली.

या शिबिरास शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथील नवजात शिशु विभागाचे प्रमुख डॉ. एल. एस. देशमुख यांनी भेट देऊन मार्गदर्शन केले. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नितीन तडस, वैद्यकीय अधीक्षक डॉ. दीपक मोरे, प्रशासकीय अधिकारी डॉ. विशाल पवार, बालरोगतज्ज्ञ डॉ. गोपाल कदम, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. दत्ता डुडुळे, डॉ. स्नेहल नगरे, सहाय्यक मेट्रन श्रीमती जोशी आदी उपस्थित होते.

हिंगोली, कळमनुरी, वसमत, औंढा नागनाथ आणि सेनगाव तालुक्यातील १०० संशयित विद्यार्थ्यांपैकी ९२ विद्यार्थ्यांची टुडी-इको तपासणी करण्यात आली. त्यामधून १८ विद्यार्थ्यांना हृदयशस्त्रक्रियेसाठी संदर्भित करण्यात आले असून, त्यांच्या शस्त्रक्रिया महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना व राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत केआयएमएस हॉस्पिटल, ठाणे येथे पूर्णपणे मोफत करण्यात येणार आहेत. हिंगोली जिल्ह्यातील अनेक गरजू बालरुग्णांनी या योजनेचा लाभ घेतला असून, यापूर्वी यशस्वी शस्त्रक्रिया झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी आरबीएसकेच्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त केली आहे.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी अधिपरिसेविका, परिसेविका, जिल्हा कार्यक्रम पर्यवेक्षक लक्ष्मण गाभणे, डीईआयसी व्यवस्थापक डॉ. संतोष नांदूरकर, ज्ञानोबा चव्हाण, राजेंद्र खंदारे, ब्रदीनाथ शेळके तसेच आरबीएसके व डीईआयसी कार्यक्रमातील वैद्यकीय अधिकारी, औषधनिर्माते, एएनएम, कार्यालयीन कर्मचारी आणि रुग्णालयातील परिचारिका यांनी विशेष परिश्रम घेतले.

जिल्ह्यातील विद्यार्थी व पालकांनी मुलांमध्ये हृदयविकाराची लक्षणे आढळल्यास वेळेत टुडी-इको तपासणी करून आजाराचे लवकर निदान करून घ्यावे आणि राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नितीन तडस यांनी केले आहे.

# वसमत लॉयन्स क्लबतर्फे विद्यार्थ्यांना मोफत दप्तर वाटप

**तभा वृत्तसेवा**
**कुरुंदा, ११ जुलै**




शिक्षण हा प्रत्येक विद्यार्थ्याचा मूलभूत हक्क असून आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याच्या शिक्षणात अडथळा येऊ नये, या सामाजिक जाणीवेतून लायन्स क्लब ऑफ बसमत प्राईड यांच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, त्रिशिवनगर येथे विद्यार्थ्यांना मोफत शालेय दप्तरांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला असून पालकांनीही या समाजोपयोगी कार्याचे मनापासून स्वागत केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लायन्स क्लब ऑफ बसमत प्राईडचे अध्यक्ष लायन संजीव बेंडके होते. यावेळी क्लबचे सचिव लायन कल्याण कुरुंदकर, माजी अध्यक्ष लायन राजू सिद्दीकी, माजी सचिव लायन बाळासाहेब बेले, उपाध्यक्ष लायन गौस बागवान, लायन शेख इम्रान शेख नूर, केंद्रप्रमुख कोमलवार, संदीप चव्हाण, बिरादार, दळवी (कुरुंदा) तसेच शिक्षकवृंद, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना नवीन शालेय दप्तरांचे वितरण करण्यात आले. नवीन दप्तर मिळाल्याने विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना नियमित शाळेत उपस्थित राहण्याचे, मन लावून अभ्यास करण्याचे, शिस्त, स्वच्छता, वेळेचे महत्त्व आणि उत्तम संस्कार जोपासण्याचे आवाहन केले.

शाळेच्या मुख्याध्यापक व शिक्षकांनी लायन्स क्लबच्या या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, अशा सामाजिक सहकार्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणाची अधिक प्रेरणा मिळते आणि समाजात शिक्षणाविषयी सकारात्मक वातावरण निर्माण होते. त्यांनी लायन्स क्लब ऑफ बसमत प्राईडचे मनःपूर्वक आभार व्यक्त करून भविष्यातही अशाच सामाजिक उपक्रमांची अपेक्षा व्यक्त केली.

यावेळी बाळासाहेब बेले म्हणाले की, लायन्स क्लब ऑफ बसमत प्राईड हा केवळ सेवा प्रकल्प राबविणारा क्लब नसून समाजातील प्रत्येक घटकापर्यंत मदतीचा हात पोहोचविण्यास कटिबद्ध आहे. कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला. विद्यार्थी, पालक आणि उपस्थित नागरिकांनी लायन्स क्लब ऑफ बसमत प्राईडच्या या समाजाभिमुख उपक्रमाचे कौतुक केले.

# शनिवारी हिंगोली जिल्ह्यात पुन्हा भूकंपाचे धक्के, नागरिकांमध्ये भिती

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ जुलै**

दोन दिवसांपूर्वी जिल्ह्यात एकानंतर एक असे चारवेळा भूकंपाचे धक्के बसले होते. त्यानंतर शनिवारी सकाळी ११.२६ वाजता पुन्हा एकदा हिंगोलीसह वसमत औंढा नागनाथ परिसरात भूकंपाचे धक्के जाणवले असून भूमापक केंद्रात या भूकंपाची तीव्रता ३.५ रिश्टर स्केल नोंद झाली आहे. अचानक घरांचे पत्रे आणि भांडी वाजू लागल्याने नागरिकांमध्ये घबराट पसरली आणि अनेकांनी सुरक्षिततेसाठी थेट रस्त्यावर धाव घेतली. सुदैवाने कोणतीही जीवीत किंवा वित्त हानी झाली नाही.

दोन दिवसांपूर्वी हिंगोली, वसमत, कळमनुरी, औंढा नागनाथ परिसरात मध्यरात्री दोन तासांमध्ये चारवेळा भूकंपाचे धक्के नागरिकाना जाणवले. या भूकंपामुळे पांगरा शिंदे, खापरखेडा आदी गावांमध्ये अनेक घरांना तडे गेले तर काही ठिकाणी भिंती पडल्या आहेत. या भूकंपाला केवळ दोन उलटले तोच शनिवारी पुन्हा हिंगोली शहरासह वसमत आणि औंढा नागनाथ परिसरात भूकंपाचे धक्के जाणवले. सकाळी ११.२६ मिनीटांनी हा भूकंपाचा धक्का जाणवला. सुदैवाने अद्याप कोणत्याही जीवीत किंवा वित्तहानीची नोंद झाली नाही मात्र भूकंपाचे धक्के वारंवार जाणवत असल्याने प्रशासनाने या घटनेची गंभीर दखल घेतली आहे. आपत्ती व्यवस्थापन विभाग सतर्क झाला असून नागरिकांनी घाबरू न जाता आवश्यक ती खबरदारी घ्यावी व अफवांवर विश्वास ठेवू नये असे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान भाजपच्या आ. डॉ प्रज्ञा सातव यांनी जिल्ह्यात विशेषत: वसमत तालुक्यात वारंवार घडणाऱ्या भूकंपाच्या कारणांचा शोध घेण्यासाठी तज्ज्ञांची समिती नियुक्त करावी अशी मागणी विधान परिषदेत केली आहे. या समितीमार्फत संबंधित गावांना भेटी देऊन परिसरात पाहणी करून भूकंपाच्या कारणांचा शोध घ्यावा. सतत होणाऱ्या भूकंपाच्या धक्क्यामुळे नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले असून यावर प्रशासनाने उपाययोजना करण्यासाठी तातडीने पावले उचलावीत अशी मागणीही आ. डॉ प्रज्ञा सातव यांनी केली आहे.



हिंगोली- आयुष्मान भारत योजनेची प्रभावी अंमलबजावणी व एनक्यूएएस मानांकनासाठी आरोग्य यंत्रणेने गतीने काम करावे यासंदर्भात जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आरोग्य विभागाला बैठकीत सूचना दिल्या. यावेळी डॉ चक्रधर मुंगल, डॉ कैलास शेळके, डॉ नितीन तडस यांच्यासह अधिकारी. छाया- विजय गुंडेकर

# माझं गाव, आरोग्य संपन्न गाव मोहीमेअंतर्गत जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त विशेष अभियान

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ जुलै**

माझं गाव, आरोग्य संपन्न गाव या शासनाच्या महत्त्वकांक्षी अभियानाला व्यापक रूप देण्यासाठी आणि ग्रामीण भागातील आरोग्याचा स्तर उंचावण्यासाठी जिल्हा परिषदेचा आरोग्य विभागासह इतर विभाग सातत्याने कार्यरत आहेत. याच अनुषंगाने ११ जुलै रोजी'जागतिक लोकसंख्या दिनाचे'औचित्य साधून आरोग्य विभागामार्फत संपूर्ण जिल्ह्यात कुटुंब नियोजन आणि सुरक्षित मातृत्वावर आधारित जनजागृती करण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नितीन तडस आणि जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. रवींद्र पुरी यांच्या नेतृत्वाखाली जागतिक लोकसंख्या दिन सप्ताह राबविण्यात येणार आहे. या मोहिमेत दोन जन्मात अंतर, कुटुंब सुदृढ निरंतर हे महत्त्वपूर्ण ब्रीदवाक्य प्रत्येक घराघरात पोहोचविण्याचा संकल्प प्रशासनाने केला आहे.

या विशेष अभियानाचा एक भाग म्हणून हिंगोली जिल्ह्यात दिनांक ११ ते १८ जुलै २०२६ या कालावधीत 'कुटुंब नियोजन सप्ताह' साजरा करण्यात येत आहे. या सप्ताहात ग्रामीण व शहरी भागातील पात्र दाम्पत्यांना कुटुंब नियोजनाच्या कायमस्वरूपी व तात्पुरत्या साधनांची सविस्तर माहिती देणे, समुपदेशन करणे आणि त्यांना आवश्यक त्या सेवा तात्काळ उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार आहे.

जनजागृतीसाठी तळागाळातील पातळीवर विशेष कुटुंब नियोजन शिबिरे, नसबंदी शस्त्रक्रिया शिबिरे, माता बैठका, महिला बचत गट सभा, ग्रामसभा, शालेय विद्यार्थ्यांच्या प्रभात फेऱ्या, आरोग्य मेळावे आणि समुदायाच्या सहभागातून विविध सभांचे आयोजन केले जाणार आहे.

जिल्ह्यात कुटुंब नियोजनाचे काम मार्च २०२६ अखेर एकूण ३६०१ नसबंदी शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडल्या आहेत. यापैकी ३५९६ महिला नसबंदी तर ५ पुरुष याशिवाय, तात्पुरत्या गर्भनिरोधक साधनांचाही मोठ्या प्रमाणावर पुरवठा आरोग्य संस्थेत करण्यात आला असून महिलांना 'आययूसीडी' (खणउ) सेवा, अंतरा इंजेक्शन, छाया गोळ्या, इमर्जन्सी कॉन्ट्रीसेप्टिव्ह आणि गर्भनिरोधक गोळ्यांचा सुरक्षितपणे लाभ देण्यात येत आहे प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालये, जिल्हा रुग्णालय आणि आयुष्मान आरोग्य मंदिरे (आरोग्य व कल्याण केंद्रे) या सर्व ठिकाणी या सेवा मोफत उपलब्ध आहेत. विशेषतः आशा स्वयंसेविकांच्या माध्यमातून पात्र दाम्पत्यांची 'ठउक २.०' या अद्ययावत प्रणालीमध्ये ऑनलाइन नोंदणी करून त्यांचा नियमित पाठपुरावा केला जात आहे. प्रसूतीनंतरच्या कुटुंब नियोजन सेवांवर प्रशासनाने विशेष लक्ष केंद्रित केले असून, प्रत्येक दाम्पत्याला त्यांच्या गरजेनुसार योग्य साधन निवडण्यासाठी शास्त्रीय समुपदेशन दिले जात आहे.

कुटुंब नियोजन ही केवळ महिलांची जबाबदारी नाही. एका सुदृढ आणि आनंदी कुटुंबासाठी पुरुषांचा सक्रिय सहभाग अत्यंत आवश्यक आहे. जिल्ह्यात महिला नसबंदीच्या तुलनेत पुरुष नसबंदीचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे पुरुष नसबंदीबाबत समाजात असलेले गैरसमज व भीती दूर करून, अधिकाधिक पुरुषांनी स्वतःहून पुढाकार घेत या प्रक्रियेत स्वतःहून सहभाग नोंदवावा, असे आवाहन आरोग्य विभागातर्फे करण्यात येत आहे. या जनजागृती अभियानात सक्रिय सहभाग नोंदवून हातभार लावावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# कारवाडी उड्डाणपूलाजवळ एकास लुटले, तिघांविरूध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ जुलै**

तालुक्यातील कारवाडी शिवारातील उड्डाणपूलाजवळ दुचाकीवर आलेल्या तिघांनी एका दुचाकीस्वारास मारहाण करून लुटल्याची घटना घडली असून याप्रकरणी हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यात तिघांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस तीन चोरट्यांचा शोध घेत आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार हिंगोली तालुक्यातील पिंपरखेड येथील अविनाश वाढवे हे हिंगोली येथे दुचाकी दुरूस्तीचे काम करतात. त्यासाठी दररोज पिंपरखेड येथून हिंगोली येथे ये-जा करतात. रात्री काम आटोपून अविनाश त्यांच्या गावी पिंपरखेडकडे परत जात असतांना मंगळवार दि ७ जुलै रोजी साडे नऊ वाजण्याच्या सुमारास जात असतांना त्यांचे वाहन कारवाडी उड्डाणपूलाजवळ आले असतांना दुचाकीवरील आलेल्या तीन चोरट्यांनी त्यांच्या दुचाकी वाहनाला लाथ मारून खाली पाडले. त्यामुळे अविनाश यांचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि ते खाली पडले. यावेळी चोरट्यांनी त्यांना मारहाण करण्यास सुरूवात केली. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे अविनाश घाबरून गेले. तिघांच्या मारहाणीमुळे ते प्रतिकार करू शकले नाही.

यावेळी चोरट्यांनी त्यांच्या जवळील १२ जार रूपये रोख व एक मोबाईल असा एकूण २५ हजार ७०० रूपयांचा मुद्देमाल धेवून पळ काढला. त्यानंतर काही वैळाने अविनाश यांनी गावात जाऊन सदर प्रकार सांगितला. त्यानंतर दि १० जुलै रोजी हिंगोली ग्रामीण पोलिस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. यावयन पोलिसांनी तीन चोरट्यांविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. पोलिस उपअधीक्षक सतीश वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक विष्णुकांत गुट्टे, उपनिरीक्षक राहुल घुले, महिला पोलिस उपनिरीक्षक श्रीदेवी वग्गे, जमादार बाळासाहेब खोडवे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. पोलिसांनी आरोपींच्या शोधासाठी पथके रवाना केली असून या चोरट्यांचा शोध पोलिस घेत आहे. पुढील तपास उपनिरीक्षक राहुल घुले हे करीत आहेत.

# स्त्री शस्त्रक्रिया अपयशावर प्रतिबधात्मक उपायोजना करा- विवेक गायकवाड

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ जुलै**



राष्ट्रीय कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत स्त्री शस्त्रक्रिया असफल होण्याचे प्रकार टाळण्यासाठी भविष्यात कडक प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, तसेच जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र आणि परवानगी दिलेले खाजगी रुग्णालयांचे तातडीने फायर व स्ट्रक्चरल ऑडिट करून घ्यावे, असे स्पष्ट निर्देश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी आज दिले.

मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या दालनात जिल्हा गुणवत्ता आश्वासन समितीची बैठक पार पडली. या बैठकीत ते बोलत होते.

या बैठकीमध्ये राष्ट्रीय कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत उद्भवलेल्या ७ स्त्री शस्त्रक्रिया असफल केसेसवर सविस्तर आढावा घेण्यात आला. शस्त्रक्रिया अपयशी ठरण्यामागच्या तांत्रिक कारणांवर चर्चा करताना मुख्य कार्यकारी अधिकारी गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. काही रुग्णांमध्ये अंतर्गत आजार किंवा गर्भधारणा ट्यूब एकमेकांना चिकटलेल्या असतात, अशा गुंतागुंतीच्या परिस्थितीत शस्त्रक्रिया असफल होण्याची शक्यता असते.

या पार्श्वभूमीवर, अशा रुग्णांच्या बाबतीत त्यांच्या नातेवाईकांना शस्त्रक्रियेपूर्वीच संभाव्य धोक्यांबाबत लेखी स्वरूपात पूर्वकल्पना देण्यात यावी, अशा सूचना त्यांनी दिल्या. तसेच, शस्त्रक्रिया पूर्णपणे यशस्वी झाल्याची खात्री पटल्यानंतरच लाभार्थ्यांना शस्त्रक्रिया प्रमाणपत्र देण्यात यावे आणि या संदर्भातील सर्व प्रस्तावांची तपासणी केली जावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

आरोग्य संस्थांच्या सुरक्षेचा मुद्दा अत्यंत गंभीरतेने घेत, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांचे फायर ऑडिट आणि स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे निर्देश दिले. यासोबतच, शासनातर्फे कुटुंब कल्याण शस्त्रक्रियेसाठी परवानगी देण्यात आलेल्या जिल्ह्यातील खाजगी रुग्णालयांचेही फायर आणि स्ट्रक्चरल ऑडिट करून घेण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले. यावेळी बैठकीला जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके, प्रभारी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नामदेव पवार, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रवींद्र पुरी, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. दत्ता डुडुळे आणि कार्यक्रम समन्वयक कमलेश ईशी उपस्थित होते.

# महिन्यातून दोन वेळा पाणीपुरवठा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ जुलै**

हिंगोली जिल्ह्यात सिध्देश्वर धरण व इसापूर धरण आहे. परंतु नगर पालिकेकडून नागरिकांना महिन्यातून दोनच वेळा पाणीपुरवठा होत असल्यामुळे तीव्र पाणीटंचाईला तोंड द्यावे लागत आहे. मागील काही महिन्यांपासून हिंगोली शहरात पाणी पुरवठा विस्कळीत झाला आहे. शहरातील काही भागांमध्ये महिन्यातून दोनच वेळा पाणीपुरवठा होत असल्यामुळे पंधरा-पंधरा दिवस पाणी साठा कसा करावा असा सवाल नागरिक करीत आहेत. नगर पालिका प्रशासन कधी मोटार बिघडली, कधी पाईपलाईन फुटली अशी कारणे पुढे करीत आहे. मात्र पाणीपट्टी वर्षभराची वसुल करीत आहे. या विरोधात आता हिंगोलीकर आवाज उठवतांना दिसत असून पाणीपुरवठा सुरळीत करण्याची मागणी नागरिकांमधून जोर धरतांना दिसत आहे.

# माळसेलू येथे शिवलिला सेवाभावी संस्थेकडून मोफत पाणीपुरवठा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ जुलै**



तालुक्यातील माळसेलू येथे पाणीटंचाईचे संकट जाणवत असल्याने गावांमध्ये शिवलीला सेवाभावी संस्थेच्या वतीने मोफत पाणीपुरवठा करण्यात येत आहे. पावसाळ्यातही माळसेलू येथे तीव्र पाणीटंचाई भासत आहे.

सध्या पावसाळा सुरू असूनही पाहीजे तेवढ्या मोठ्या प्रमाणात पाऊस न झाल्याने ग्रामीण भागातील विहीरी, नदी, नाले तसेच ओढे आणि बोअरला पाणी नाही. पाणीपातळी वाढली नसल्याचे चित्र दिसत आहे. तालुक्यातील माळसेलून येथे तीव्र पाणी टंचाई भासत असतांना शिवलीला संस्थेच्यावतीने मोफत पाणीपुरवठा करण्यात येत आहे. यावेळी गावकऱ्यांनी मोफत पाणीपुरवठा सुरू केल्याने आभार व्यक्त केले आहेत यावेळी संस्थेचे अध्यक्ष अनिल नायक, काशीरामजी वामन, भागवत वामन, जगन वामन, सदाशिव वामन, श्याम वामन यासह गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. माळसेलू येथे दरवर्षी पाणीटंचाईचा सामना करावा लागतोय. कोट्यावधी रुपये खर्च करून गावांमध्ये जलजीवन मिशन योजना राबविण्यात आली आहे. मात्र अद्याप पर्यंत या जल जीवन मिशन योजनेअंतर्गत पिण्याचे पाणी गावाला मिळालेले नाही. त्यामुळे गावकऱ्यांना पिण्याच्या पाण्यासाठी रानोमाळ भटकंती करावी लागत आहे. शिवलीला सेवाभावी संस्थेच्यावतीने गावांमध्ये पाण्यासाठी होणारी भटकंती थांबवण्यासाठी मोफत पिण्याचे पाणी उपलब्ध करून दिले आहे. त्यामुळे गावकऱ्यांनी या संस्थेचे आभार मानले केले आहेत.

# पंचशील विद्यालयासमोर भरधाव वाहनांचा कहर

## हजारो विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात, गतिरोधकाची तातडीची मागणी

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. ११ जुलै -**

हदगाव शहरालगत असलेल्या पंचशील प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मात्र विद्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोरून जाणारा हदगाव-नांदेड मुख्य मार्ग हा दिवसेंदिवस वाढत्या वाहतुकीमुळे धोकादायक बनला असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अनेक वेळा संबंधित विभागाकडे गतिरोधक उभारण्याची मागणी करूनही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने पालक, शिक्षक व नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.



या मार्गावर बस, ट्रक, टिप्पर, ट्रॅक्टर, दुचाकी, चारचाकी तसेच अवैध वाहतूक करणारी जड वाहने मोठ्या वेगाने धावत असतात. त्यामुळे शाळेत येणाऱ्या-जाणाऱ्या विद्यार्थ्यांना रस्ता ओलांडताना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. सकाळी व दुपारी शाळा सुरू होण्याच्या आणि सुटण्याच्या वेळेत परिस्थिती अधिकच गंभीर बनते.

विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे रस्ता ओलांडून देण्यासाठी शिक्षक व संस्थाचालकांना स्वतः रस्त्यावर उभे राहून वाहतूक नियंत्रित करावी लागत आहे. मात्र ही व्यवस्था कायमस्वरूपी उपाय नसून भविष्यात एखादी दुर्दैवी दुर्घटना घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित यंत्रणांवर राहणार असल्याची भावना नागरिक व्यक्त करीत आहेत.

स्थानिक नागरिक, पालक व सामाजिक कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे की, एखादा अपघात घडल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा त्याआधीच विद्यालयासमोर तातडीने गतिरोधक, झेब्रा क्रॉसिंग, वेगमर्यादा फलक आणि शाळा परिसर असल्याचे इशारा फलक उभारण्यात यावेत. त्यामुळे संभाव्य अपघात टाळून विद्यार्थ्यांचे प्राण वाचू शकतील.

दरम्यान, संबंधित विभागाने लवकरात लवकर गतिरोधक उभारले नाहीत, तर सामाजिक कार्यकर्ते स्वखर्चाने गतिरोधक उभारण्याचा इशारा देत असून, विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी लोकसहभागातून पुढाकार घेण्याची तयारी दर्शविली आहे.

याचबरोबर हदगाव शहराबाहेरून जाणारा पांदण रस्ता सध्या अतिक्रमणाच्या विळख्यात अडकला आहे. हा रस्ता अतिक्रमणमुक्त करून वाहतुकीसाठी खुला केल्यास शाळेत जाणारे विद्यार्थी व पालक मुख्य महामार्गाऐवजी सुरक्षित पर्यायी मार्गाचा वापर करू शकतील. तसेच शहरातील वाहतुकीचा ताण कमी होऊन रहदारीची समस्या मोठ्या प्रमाणात सुटण्यास मदत होईल, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला आहे.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने प्रशासनाने या दोन्ही मागण्यांकडे गांभीर्याने पाहून तातडीने कार्यवाही करावी, अशी एकमुखी मागणी पालक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

# भोकर येथे आरोग्य गूरूकूल शाखेचे उद्घाटन

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. ११ जुलै -**

हल्ली धावपळीच्या यूगात चूकीच्या जिवनशैलीमूळे आरोग्यावर होत असलेले परिणाम निरोगी आरोग्यासाठी व चूकीची जिवनशैली बदलवून टाकण्यासाठी भोकर येथील तामसा रोड वर दि.११ जूलै रोजी आरोग्य गूरूकूल या शाखेचे उद्घाटन भोकर नगरपरिषदेचे नगराध्यक्ष भगवानराव दंडवे यांचे हस्ते फित कापून करण्यात आले.आरोग्य गूरुकूलचे संचालक लिंगूराम ताटेवाड, गजानन ताटेवाड जेष्ठ पत्रकार एल.ए.हिरे,नगरसेवक डॉ.मनोज गिमेकर,पप्पू बोलेवार,रमेश कोंडलवार,सूध्दनवार सर कदम सर,जाधव सर,कोकाटे,आदिंची प्रमूख उपस्थिती होती.यावेळी संचालक ताटेवाड यांनी आरोग्यविषयक माहिती देताना सांगीतले की,आरोग्य गूरुकूल



शाखेत २० टक्के व्यायाम चालणे फिरणे व ८०टक्के न्यूट्रिशन झोप,योग्य पाण्याचे प्रमाण प्रोटीन्स,चांगले फॅट, मिनरल्स,व्हिटॅमिन्स,या संदर्भात नियमित मार्गदर्शन नागरीकांना औषधीमूक्त जिवन जगण्यासाठी प्रोत्साहन करणे दररोज सकाळी ७ ते ८ या वेळेत नागरीकांनी नियमित उपस्थित राहून न्यूट्रिशन आहाराचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले.आरोग्य सल्लागार मंकावार,विनायक पौळ,मंगेश पौळ,गणेश पाटोळे यांनी आरोग्याविषयी सविस्तर माहिती दिली या शाखेत नागरीकांची नियमित आरोग्य तपासणी मोफत केली जाईल व आरोग्य संदर्भात मार्गदर्शन करण्यात येईल असे आरोग्य गूरूकूल शाखेच्या वतीने सांगण्यात आले.अध्यक्षीय समारोप करताना भगवान दंडवे यांनी भोकर येथील सर्व नागरीकांनी आपले आरोग्य निरोगी राहण्यासाठी आरोग्य गूरूकूल शाखेत नियमित येवून आरोग्य तपासणी करावी व आपल्या परिवारातील सदस्यांच्या आरोग्याची काळजी घ्यावी असे ते म्हणाले सूत्र संचलन डॉ.मनोज गिमेकर यांनी केले तर आभार ताटेवाड यांनी मानले यावेळी असंख्य प्रतिष्ठित नागरीक महिला उपस्थित होते.



## स्व. अमोल आबादार यांच्या पुण्यस्मरण दिनानिमित्त महारक्तदान शिबिर

**मुदखेड** -सामाजिक, शैक्षणिक व जनहिताच्या कार्यातून सर्वसामान्यांच्या मनात वेगळी ओळख निर्माण करणारे स्वर्गीय अमोल आबादार यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त मुदखेड येथे महारक्तदान शिबिर, वृक्षारोपण तसेच वाई येथील अविनाश जंगेवाड मित्र परिवाराच्या वतीने जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना वही पेन वाटप करण्यात आले,व सुनील दत्तात्रय शिंदे यांच्या वतीने मूकबधिर विद्यार्थ्यांना वही पेन व फराळ वाटप कार्यक्रमासह विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या महारक्तदान शिबिरात तब्बल ३०० रक्तदात्यांनी रक्तदान करून समाजाप्रती आपली बांधिलकी व्यक्त केली. रक्ताची गरज भासणाऱ्या रुग्णांसाठी हे रक्तदान जीवनदायी ठरणार असल्याने या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात आले. युवक, सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होत शिबिर यशस्वी केले.कार्यक्रमाच्या निमित्ताने वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेशही देण्यात आला.या कार्यक्रमास नांदेड महानगरपालिकेच्या महापौर सविता मुळे, संतोष मुळे, विश्व हिंदू परिषदेचे केंद्रीय सदस्य वीरूपक्ष शिवाचार्य महाराज,सर्जेराव पा. ढगे, दीपक पाटील, शशिकांत पाटील,राजेश पाटील, गोविंद शिंदे नागेलीकर, मुदखेड नगराध्यक्ष विश्रांती कदम, माधव पाटील कदम, पाणीपुरवठा सभापती श्याम चंद्रे,भाजपा शहराध्यक्ष रामसिंग चव्हाण,भाजपा युवा मोर्चा शहराध्यक्ष राम आबादार, शशिकांत पाटील, यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थित मान्यवरांनी स्वर्गीय अमोल आबादार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. आपल्या मनोगतात त्यांनी अमोल आबादार यांनी समाजकारण, युवक संघटन आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी केलेल्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजित करण्यात आलेले रक्तदान शिबिर व सामाजिक उपक्रम हे समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आयोजक,हनुमान चालीसा समिती,राधाकृष्ण गोसेवा फाउंडेशन, यांनी परिश्रम घेतले.

## नांदेड जिल्ह्यात १२२ रिक्त रास्तभाव दुकानांसाठी परवाना प्रक्रियेला सुरुवात

**नांदेड** -राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ तसेच शासन निर्णय ६ जुलै २०१७ व २ फेब्रुवारी २०२२ मधील तरतुदींनुसार नांदेड जिल्ह्यात विविध कारणांमुळे रिक्त झालेल्या आणि सध्या पर्यायी व्यवस्थेत सुरू असलेल्या एकूण १२२ रास्तभाव दुकानांसाठी नवीन परवाने मंजूर करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, पात्र स्थानिक संस्था व गटाकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. परवाना मंजुरीसाठी अर्ज स्वीकारताना शासनाने निश्चित केलेल्या प्राधान्यक्रमानुसार ग्रामपंचायत व तत्सम स्थानिक स्वराज्य संस्था, नोंदणीकृत स्वयंसहाय्यता बचत गट, नोंदणीकृत सहकारी संस्था, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम अथवा संस्था नोंदणी अधिनियमांतर्गत नोंदणीकृत संस्था तसेच महिला स्वयंसहाय्यता बचत गट व महिलांच्या सहकारी संस्था यांना प्राधान्य दिले जाणार आहे.
ज्या रिक्त रास्तभाव दुकानांबाबत न्यायालय अथवा वरिष्ठ कार्यालयाकडे अपील प्रलंबित आहे, अशा जागांचा या प्रक्रियेत समावेश करण्यात आलेला नाही. केवळ कायदेशीरदृष्ट्या स्पष्ट असलेल्या जागांसाठीच अर्ज स्वीकारले जातील. इच्छुक व पात्र संस्थांनी विहित कालावधीत संबंधित तहसीलदार कार्यालयाशी संपर्क साधून अर्ज सादर करावेत. तहसीलदार कार्यालयामार्फत प्राप्त झालेल्या अर्जांचाच विचार करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.रास्तभाव दुकानांचे परवाने मंजूर करण्याची कार्यवाही जिल्हा पुरवठा अधिकारी, नांदेड यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय क्रमांक राभादु-१७१६/प्र.क्र.२३९/नापु-३१, दि. ६ जुलै २०१७ मधील परिच्छेद ४(२)(इ)नुसार गठित समितीमार्फत करण्यात येणार आहे.
तालुकानिहाय रिक्त रास्तभाव दुकाने पुढीलप्रमाणे आहेत :
हदगाव- १९, नांदेड- १८, भोकर- ११, देगलूर- ११, हिमायतनगर -१०, धर्माबाद- १०, मुदखेड - ७, कंधार- ७, उमरी- ६, लोहा- ६, बिलोली- ६, मुखेड- ३, किनवट- ३, अर्धापूर- २, नायगाव- २ आणि माहूर -१. जिल्हा प्रशासनाने पात्र संस्थांनी या संधीचा लाभ घेऊन विहित मुदतीत अर्ज सादर करण्याचे आवाहन केले आहे.

## सोमवारी शिकाऊ उमेदवारांसाठी रोजगार मेळाव्याचे आयोजन

**नांदेड**-मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्रद्वारा श्री गुरुगोबिंदसिंघजी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नांदेड यांच्यावतीने १३ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वा. आयटीआय पास उमेदवारांसाठी शिकाऊ उमेदवारी योजनेअंतर्गत पीएमएनएएम भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यासाठी सर्व इंजिनियरीग ट्रेडच्या प्रशिक्षणार्थ्यांची शिकाऊ उमेदवार म्हणून भरती करण्यात येणार आहे.

# गोकुंदा रेल्वे उड्डाणपूल रखडल्याप्रकरणी राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाकडे तक्रार

**तभा वृतसेवा**
**किनवट , दि. ११ जुलै -**

नांदेड जिल्ह्यातील दुर्गम आदिवासी व पेसा क्षेत्र असलेल्या किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघातील गोकुंदा येथील राष्ट्रीय महामार्ग क्र. १६१ वरील रेल्वे उड्डाणपूलाचे काम तब्बल आठ वर्षांपासून रखडल्याने आदिवासी नागरिकांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. या गंभीर प्रकरणाची दखल घेऊन तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी आमदार भीमराव केराम यांनी राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाचे अध्यक्ष अंतरसिंह आर्य यांच्याकडे सविस्तर निवेदनाद्वारे केली आहे.

आमदार केराम यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे की, गोकुंदा ग्रामपंचायत ही पेसा कायदा, १९९६ अंतर्गत अधिसूचित आदिवासी क्षेत्र असून राष्ट्रीय महामार्ग क्र. १६१ हा हैदराबाद, माहूर, नांदेड आणि नागपूरला जोडणारा महत्त्वाचा मार्ग आहे. या मार्गावरील रेल्वे उड्डाणपुलाला अनेक वर्षांपूर्वी मंजुरी मिळूनही भारतीय रेल्वे आणि भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्यातील समन्वयाच्या अभावामुळे आजपर्यंत काम पूर्ण झालेले नाही.

या विलंबामुळे शेतकरी, विद्यार्थी, रुग्ण, महिला आणि सर्वसामान्य नागरिकांना दररोज वाहतूक कोंडीचा व जीवितहानीचा धोका पत्करावा लागत आहे. वेळेत उपचार न मिळाल्याने रुग्णांना त्रास सहन करावा लागतो, तर विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक व्यवहारांवरही त्याचा विपरीत परिणाम होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

आमदार केराम यांनी संविधानातील कलम ४६, कलम ३३८-अ, तसेच पेसा अधिनियम, १९९६ चा उल्लेख करून आदिवासी भागातील पायाभूत सुविधांचा विकास हा शासनाचा घटनात्मक दायित्व असल्याचे नमूद केले आहे.

राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाने रेल्वे मंत्रालय, रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि महाराष्ट्र शासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची तातडीने संयुक्त बैठक बोलवावी, उड्डाणपूल पूर्ण करण्यासाठी निश्चित कालमर्यादा जाहीर करावी, आयोगाच्या पथकाकडून प्रत्यक्ष पाहणी करून आठ वर्षांच्या विलंबासाठी जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाईची शिफारस करावी, तसेच या प्रकरणाचा नियमित आढावा घ्यावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

दुर्गम आदिवासी भागातील नागरिकांना सुरक्षित, अखंड आणि सन्मानजनक दळणवळण सुविधा मिळणे हा त्यांचा घटनात्मक अधिकार आहे. गोकुंदा रेल्वे उड्डाणपूलाचे काम तातडीने पूर्ण होणे ही काळाची गरज असून राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाने या प्रकरणात त्वरित हस्तक्षेप करावा, असे आवाहन आमदार भीमराव केराम यांनी केले आहे.

# गुरुद्वारा व दरबार मस्जिद परिसरात SIR विशेष शिबिरांना उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ११ जुलै -**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार तथा जिल्हा निवडणूक अधिकारी व जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली ०८७ नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघात 'विशेष सखोल पुनर्निरीक्षण' (Special Intensive Revision-SIR) कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत शनिवारी (दि. ११ जुलै) गुरुद्वारा परिसर तसेच दरबार मस्जिद, सराफा गल्ली येथे विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरांना मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ आणि सहायक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार संजय वारकड यांनी भेट देऊन कामकाजाची पाहणी केली. त्यांनी उपस्थित अधिकारी, कर्मचारी व बीएलओ यांना आवश्यक सूचना देत शिबिरांच्या माध्यमातून अधिकाधिक पात्र मतदारांपर्यंत पोहोचण्याचे निर्देश दिले.



गुरुद्वारा परिसरातील शिबिरात डॉ. सचिन खल्लाळ यांनी काही मतदारांचे Enumeration Form स्वतः बीएलओच्या पद्धारे भरून घेतले. यावेळी उपस्थित सामाजिक कार्यकर्त्यांशी संवाद साधून त्यांनी डखठ प्रक्रियेबाबत समाजामध्ये व्यापक जनजागृती करण्याचे आवाहन केले. शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यानंतर दरबार मस्जिद, सराफा गल्ली येथे भेटीदरम्यान इमाम साहेब, मस्जिद प्रतिनिधी आणि सामाजिक कार्यकर्त्यांशी बैठक घेण्यात आली. बैठकीत डखठ प्रक्रियेसंदर्भातील विविध बाबींसह विशेषतः nomaly विषयी मतदारांच्या मनात असलेल्या शंकांचे सविस्तर निरसन करण्यात आले. अनेक मतदारांना पोरश्रू संदर्भात संभ्रम असल्याचे निदर्शनास आल्याने त्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले आणि सर्व प्रश्नांची समाधानकारक उत्तरे देण्यात आली.

यावेळी उपस्थितांना एर्पीाशीरींळेप Form वेळेत भरून देण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच मस्जिदीच्या माध्यमातून डखठ कार्यक्रमाबाबत आवश्यक जनजागृती करण्यात येईल, असे आश्वासन इमाम साहेबांनी दिले.

जिल्हा प्रशासनाने सर्व पात्र मतदारांनी डखठ प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेऊन आपले एर्पीाशीरींळेप ़्रेी वेळेत भरून द्यावेत तसेच परिसरातील इतर नागरिकांमध्येही याबाबत जनजागृती करावी, असे आवाहन केले आहे.

# दगडगांवच्या रहाटकर आणि उराडे यांना शिष्यवृत्ती प्रदान

**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि. ११ जुलै -**

नांदेड जिल्ह्यातील लोहा तालुक्यातील ग्राम दगडगांव येथील कवी साईनाथ बालाजी रहाटकर आणि सुदर्शन नितीन उराडे यांना मान्यवरांकडून शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. रोख ३०० रू प्रत्येकी व सन्मान करण्यात आला.



दि.इन्स्टिटयूशन ऑफ इंजिनिअर्स इंडिया पुणे लोकल सेंटर,ऋषि प्रकाशन पुणे, विकासकर्मी अभियंता मित्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्व.मोतीलालजी धूत, स्व.प्रभाकरजी गानू आणि स्व.सुरजबाई धूत यांच्या स्मरणार्थ दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीच्या माध्यमातून गरजू होतकरू विद्यार्थ्यांना शोध अभियांत्रिकी मनाचा हा उपक्रम दरसाल राबविण्यात येत असतो.

यावेळी कार्यक्रमात ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ.श्रीपाल सबनीस, अभियंता मित्र मासिकचे संपादक डॉ.कमलकांत वडेलकर,प्रमुख पाहुणे अध्यक्ष-दि. इन्स्टिटयूशन ऑफ इंजिनिअर्स इंडिया पुणे लोकल सेंटर,डॉ. दत्तात्रय बोरमने,

प्रमुख वक्ते,जलसंपदा विभागाचे निवृत्त प्रधान सचिव, नंदकुमार वडनेरे,प्रमुख मान्यवर व्यंकटराव गायकवाड, एच.के. देवकाते,माजी सचिव डॉ. जी.एस.मुंदडा,काटे आदि दिग्गज मान्यवरांकडून दोघांचा गौरव करण्यात आला.

# बुलेटच्या कर्णकर्कश सायलेंसरवर ; चंद्रशेखर कदम यांचा इशारा

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ११ जुलै -**

किनवटचे उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रशेखर कदम यांनी बुलेटसह इतर वाहनांना बसविण्यात आलेले बेकायदेशीर व कर्णकर्कश आवाजाचे सायलेंसर, वाहनातून फटाक्यासारखे आवाज काढणे, स्टंटबाजी तसेच मुलींची छेडछाड करणाऱ्या वाहनचालकांविरोधात सोमवारपासून विशेष मोहीम राबवून कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा दिला आहे. किनवट शहरात विद्यार्थिनींची छेडछाड, वेगाने वाहन चालविणे आणि सार्वजनिक शांतता भंग करणाऱ्या प्रकारांच्या तक्रारी वाढत असल्याचे त्यांनी सांगितले. वाहनांमध्ये विनापरवाना बदल करणे हा मोटार वाहन कायद्यानुसार गुन्हा असून अशा वाहनांना जप्त करण्याचा अधिकार पोलिसांना असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कारवाईदरम्यान पोलिसांशी वाद घालणे किंवा दबाव आणण्याच्या उद्देशाने व्हिडिओ करून सोशल मीडियावर प्रसारित करण्याचाही गंभीरपणे विचार केला जाईल, असा इशारा देत नागरिकांनी कायद्याचे पालन करून पोलिसांना सहकार्य करण्याचे आवाहन उपविभागिय पोलीस अधिकारी चंद्रशेखर कदम यांनी केले.



# धनेगाव सज्जाचे तलाठी बदला : मनोहर शिंदे

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ११ जुलै -**

धनेगाव येथील तलाठी सज्जा वरील तलाठी डी.एस. सोनटक्के हे सातबारा वर फेरफार नोंद, प्लॉटची सातबारा वर फेरफार नोंद घेणे, वारसा हक्काने फेरफार घेणे या कामासाठी अधिकच्या पैशाची मागणी करीत असल्याची तक्रार माजी जि. प. सदस्य तथा भाजपाचे पंचायत व ग्रामविकास प्रकोष्ठ अध्यक्ष मनोहर पाटील शिंदे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे दिनांक १० जुलै २०२६ रोजी तक्रार एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

नांदेड लगत असलेल्या धनेगाव येथील तलाठी सज्जा व अंतर्गत बळीराम पूर ग्रामपंचायत चा पण समावेश आहे या तलाठी सज्जाचे तलाठी डी.एस. सोनटक्के हे येथील नागरिकांची आर्थिक पिळवणूक करून सातबारावर नोंद घेण्यासाठी लिंक रजिस्ट्री व लागणारी मूळ कागदपत्रे दिल्यानंतरही सातबारावर नोंद घेण्यासाठी २५ हजार ते ५० हजार रुपयाची मागणी करीत असल्याच्या तक्रारी ग्रामपंचायतकडे आल्याने सदरील बाबीसाठी वारंवार सांगूनही नेहमी नेहमी पैशाची मागणी करून तेवढेच पैसे द्यावे लागतील. साधा ३०÷४० क्षेत्रफळ असलेला प्लॉट सातबारा उताऱ्यावर लावण्यासाठी ही २५ हजार रुपयाची मागणी करत आहे. या पलीकडे वारसा हक्काची नोंदीसाठी तलाठी कार्यालयात गेल्यास त्यांनाही पैशाची मागणी होत. आहे सदरील तलाठ्याच्या आर्थिक पिळवणुकीमुळे येथील नागरिक अडचणीत आले आहेत. म्हणून धनेगाव येथील तलाठी सज्जाचे तलाठी डी एस सोनटक्के यांची बदली करून या ठिकाणी दुसरा तलाठी देण्यात यावा अशा मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी यांना माजी जि. प. सदस्य तथा भाजपाचे पंचायत व ग्रामविकास प्रकोष्ठ अध्यक्ष मनोहर पाटील शिंदे यांनी एका नियोजनाद्वारे केली आहे.



# पेसा शिक्षक भरतीतील सर्व रिक्त पदे तात्काळ भरावीत : आ. भीमराव केराम

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ११ जुलै -**

नांदेड जिल्ह्यातील पेसा क्षेत्रातील शिक्षक भरती (२०२५-२६) अंतर्गत रिक्त असलेली सर्व पदे तात्काळ उपलब्ध करून पात्र आदिवासी उमेदवारांची गुणवत्तेनुसार भरती प्रक्रिया पूर्ण करावी, अशी मागणी किनवट-माहूरचे आमदार भीमराव केराम यांनी महाराष्ट्र राज्याचे शिक्षण आयुक्त (प्राथमिक) यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात आ. केराम यांनी नमूद केले आहे की, किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघ हा अनुसूचित जमातीबहुल व पेसा क्षेत्रात मोडत असून, येथील अनेक पात्र आदिवासी उमेदवार शिक्षक भरतीच्या प्रतीक्षेत आहेत. भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद २४४(१), पाचवे अनुसूची, पेसा अधिनियम-१९९६, पेसा नियम-२०१४ तसेच शासनाच्या विविध निर्णयांनुसार अनुसूचित क्षेत्रातील स्थानिक पात्र उमेदवारांना भरतीमध्ये प्राधान्य देणे बंधनकारक आहे. तसेच शिक्षण आयुक्तांनी २५ फेब्रुवारी २०२६ रोजी जारी केलेल्या आदेशानुसार शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी-२०२५ च्या गुणवत्तायादीच्या आधारे उर्वरित रिक्त पदे भरण्याचे निर्देश दिले असतानाही नांदेड जिल्ह्यातील पेसा क्षेत्रातील अनेक पदे अद्याप रिक्त असल्याने पात्र उमेदवारांवर अन्याय होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. नांदेड जिल्ह्यातील सर्व रिक्त शिक्षक पदे तातडीने भरून गुणवत्तेनुसार भरती प्रक्रिया पूर्ण करावी, अन्यथा पात्र उमेदवारांच्या घटनात्मक व वैधानिक अधिकारांचे उल्लंघन होण्याची शक्यता असल्याचा इशाराही आ. केराम यांनी दिला आहे. यासंदर्भात शिक्षण आयुक्त आणि शालेय शिक्षण विभागाने तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन आदिवासी युवक-युवतींना न्याय द्यावा तसेच शासनाच्या पेसा धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी अपेक्षा आ. भीमराव केराम यांनी व्यक्त केली.



CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## ज्ञानामृत आनंदलहरी - १४९९

**मातेपाशी आहे नाही । बालक नेणेची काही ।।**
**जैसे मातेपाशी बाळ । सांगे जीवींचे सकळ ।।**

आई म्हटले की नि:स्वार्थ प्रेम, लडिवाळपणा, हट्टाची पूर्तता ही आलीच. आर्थिक दरिद्री असलेली मातासुध्दा आपल्या लेकराचे लळे कोणत्या का पध्दतीने होईनात; पण ते पुरवल्याशिवाय राहात नाही. अर्थात, माता ही आर्थिक दरिद्री म्हणजेच गरीब असली तरी ती लेकराचे लळे पुरवण्यात कमी पडत नाही. आपल्या आईजवळ आपण मागतो ते उपलब्ध आहे का ? याचा विचार कोणतेही बालक करीत नाही. त्याला जेव्हा वाटेल जे वाटेल ते तिच्याकडे मागते आणि त्याची माता आहे त्या परिस्थितीतून मार्ग काढून त्याचा लळा पुरवते. अगदी पंढरीची माऊली सुध्दा भक्तरुपी लेकरांचा अट्टहास असाच पुरवते. **मातेपाशी आहे नाही । बालक नेणेची काही ।।**, सेनाजींच्या या म्हणण्याप्रमाणे या विठू माऊलीकडे काय उपलब्ध आहे, काय उपलब्ध नाही, याचा भक्तरुपी लेकरांनी विचार करायचा नसतो.



जगाच्या कल्याणासाठी वाट्टेल ते मागायचे असते आणि या माऊलींनी ते पुरवायचे असते. विठू माऊली भक्तांचे लळे पुरवण्यात कधीच कमी पडत नाही, असा सेनाजींचा विश्वास आहे. भक्तांनी स्वार्थापोटी कांही मागू नये. भक्तीही स्वार्थापोटी करू नये, असेही सेनाजींना वाटते. सेनाजींची ही अपेक्षा पूर्ण करणाराच खरा भक्त असेल असे आम्हास वाटते. विठू माऊली जशी आई आहे, तसे संतही आई असतात.

**मातेपाशी आहे नाही । बालक नेणेची काही ।।**
**जैसे मातेपाशी बाळ । सांगे जीवींचे सकळ ।।**

कोणत्याही मुलांचे लहानपणी खरे विश्व हे त्यांची आई असते. विश्वाचे सर्व रुप आईच्या ठिकाणी एकवटलेले असते. म्हणूनच हे मूल सुख दु:खाच्या सर्व गोष्टी मनमोकळेपणाने फक्त आईपुढे मांडते. आईपुढे बोलतांना त्याला कसलाच संकोच वाटत नाही. पण या मुलाला जेव्हा तारूण्याचा सहवास लाभतो, तेव्हा मात्र त्याला भौतिक विश्वाची जाणीव होऊ लागते आणि दुर्दैवाने हे मूल तारूण्यात आईरुपी विश्वाला संकुचित करते. पण आपल्या बाबतीत असे घडणार नाही. कारण माझी संत, महात्मारुपी आई ही सदैव विश्वरूप आहे. मी या आईजवळ कसलाच संकोच न करता सातत्याने सर्व कांही सांगत राहतो. असे सांगत असतांना मला तारूण्याची, संसाराची, भौतिक सुख वस्तूची जाणीव होत नाही. सातत्याने मला फक्त आत्मनंदाची जाणीव होते. आत्मानंदाच्या अनुषंगाने बोलतांना आपण संत महात्मारुपी आईशी एकरूप होऊन जातो. **जैसे मातेपाशी बाळ । सांगे जीवींचे सकळ ।।**, असे सेनाजी म्हणतात. आपणाला विठू माऊली तसेच संत महात्मा रुपी आईशी एकरूप होता नाही आले तरी चालेल; पण जन्मदात्या आईपासून तरी दूर होता कामा नये. कारण असे झाले तर जीवनाला, मोठेपणाला काहीच अर्थ उरत नाही. म्हणून आपणही आईपासून दूर होऊ नये व आई वडीलांनाही आपल्यापासून दूर करु नये. प्रसंगानुरुप आपली आई ही वडिल होऊ शकते व आपले वडील हे आई होऊ शकतात. त्यामुळे आईवडिलांप्रतीचा भाव सारखा राहील याकडे लक्ष असणे योग्य होईल. जय जय राम कृष्ण हरी ।।.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : रविवार,**
**दि. १२ जुलै २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - ज्येष्ठ कृ. त्रयोदशी**
**ऋतु - ग्रीष्म ।**
**नक्षत्र- रोहिणी (०८.२८)**
**योग - वृद्धि (२०.०६)**
**करण - गरज (१२.१८)**
**राहू काल : रविवार**
**दु. ०४.३० ते ०६.००**

**दिनविशेष :१६७४: छत्रपती शिवाजी महाराजांनी इंग्रजांशी मित्रत्वाचा तह केला.**
**१९४९: भारतीय क्रिकेट खेळाडू नारायण साठम यांचा जन्म.**
**१९६१: प्रसिद्ध दाक्षिणात्य (कन्नड) अभिनेते, गायक आणि निर्माते शिव राजकुमार यांचा जन्म.**
**१९९९: हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते राजेंद्र कुमार यांचा मृत्यू.**
**२०१२: प्रसिद्ध भारतीय कुस्तीपटू आणि अभिनेते दारा सिंग यांचा मृत्यू.**



बालगंधर्व अपर्णा सहस्त्रबुद्धे गुरू वठारे

## नटसम्राट बालगंधर्व स्मृतीदिनानिमित्त बुधवारी स्वर आराधना कार्यक्रम

### गुरू वठारे आणि अपर्णा सहस्त्रबुद्धे यांचा होणार गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जुलै-**

मराठी संगीत रंगभूमीचे दैवत नटसम्राट बालगंधर्व यांच्या स्मृतीदिनाचे औचित्य साधून कै. सिध्दा पाटील स्मृती समितीतर्फे यावर्षीही भव्य सांस्कृतिक व संगीत कार्यक्रम बुधवार १५ जुलै रोजी सायंकाळी ५.३० वाजता आयोजिला आहे.

येथील हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात (ॲम्फी थिएटर) 'अनाहत' सोलापूर प्रस्तुत ''स्वर आराधना'' हा बहारदार कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमामध्ये हैदराबाद येथील नामांकित ज्येष्ठ गायिका आराधना कऱ्हाडे-शास्त्री आपल्या सुमधूर आवाजात शास्त्रीय व नाट्यसंगीताची मैफल सादर करणार आहेत. त्यांना तबल्यावर विवेक कायल तर संवादिनीवर (हार्मोनिअम) ओंकार पाठक यांची साथसंगत लाभणार आहे. या कार्यक्रमाचे दिग्दर्शन आणि निवेदन मंजूषा गाडगीळ करणार आहेत. याच कार्यक्रमाचे औचित्य साधून नाट्य क्षेत्रातील प्रसिद्ध संयोजक व व्यवस्थापक गुरू वठारे तसेच पाटील परिवाराच्या जुन्या स्नेही, प्रसिद्ध भारूड व कीर्तनकार आणि वि. मो. मेहता प्रशालेच्या माजी मुख्याध्यापिका अपर्णा सहस्त्रबुद्धे यांना त्यांच्या उल्लेखनीय व प्रदीर्घ सेवेबद्दल गौरविण्यात येणार आहे. हा सत्कार सोहळा महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, शाखा सोलापूरचे अध्यक्ष व जिल्हा प्रमुख आणि माजी प्राचार्या डॉ. श्रुती श्री. वडकबळकर यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. संगीतप्रेमी व रसिक प्रेक्षकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा आणि कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन कै. सिध्दा पाटील स्मृती समितीचे ॲड. आर. एस. तथा बाबू पाटील यांनी केले आहे.

# जलजीवन मिशनसाठी झेडपीची भरती प्रक्रिया सुरु

## निवृत्त अभियंते व अधिकाऱ्यांना संधी

### करार पद्धतीने नियुक्ती; १४ जुलैपर्यंत अर्ज स्वीकारणार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जुलै -**

ग्रामीण भागातील जलजीवन मिशनची कामे अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने अनुभवी मनुष्यबळाचा आधार घेण्याचा निर्णय घेतला आहे. ग्रामीण पाणीपुरवठा विभागामार्फत राज्य पाणी व स्वच्छता मिशनअंतर्गत रिक्त पदे भरण्यासाठी सेवानिवृत्त शासकीय व निमशासकीय अधिकाऱ्यांकडून करार पद्धतीने अर्ज मागविण्यात आले आहेत.

या भरती प्रक्रियेत सेवानिवृत्त उपअभियंता (स्थापत्य) तसेच वर्ग-१ आणि वर्ग-२ संवर्गातील अधिकारी पात्र असणार आहेत.

जलजीवन मिशनअंतर्गत सुरू असलेल्या विविध पाणीपुरवठा योजनांची प्रभावी अंमलबजावणी, तांत्रिक देखरेख आणि प्रशासकीय कामकाज अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने ही नियुक्ती केली जाणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेकडून देण्यात आली.

या नियुक्त्या राज्य शासनाच्या १० डिसेंबर २०१९ च्या शासन निर्णयानुसार करार तत्त्वावर करण्यात येणार असून, त्यामधील सर्व अटी व शर्ती लागू राहतील. त्यामुळे अनुभवी सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या ज्ञानाचा आणि प्रशासकीय अनुभवाचा लाभ जलजीवन मिशनला मिळणार असल्याचे प्रशासनाचे मत आहे. इच्छुक उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक कागदपत्रांसह १४ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर यांच्या कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

भरतीसंदर्भातील पात्रता, अटी, अर्जाचा नमुना आणि इतर सविस्तर माहिती जिल्हा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असून, पात्र सेवानिवृत्त अधिकारी व अभियंत्यांनी मुदतीपूर्वी अर्ज सादर करून या संधीचा लाभ घ्यावा, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# पत्रकारांसाठी आज मोफत आरोग्य तपासणी शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जुलै-**



स्व. राजेश अण्णा कोठे यांच्या जयंतीनिमित्त सोलापूर शहरातील प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल मीडिया प्रतिनिधींसाठी विशेष मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर रविवार, दि. १२ जुलै २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता अक्कलकोट रोड, एमआयडीसी येथील महालक्ष्मी बँक्वेट येथे पार पडणार आहे. या शिबिरामध्ये पत्रकारांसाठी लिव्हर फंक्शन टेस्ट, हिपॅटायटिस बी आणि सी, रँडम ब्लड शुगर, तसेच संगणकीकृत नेत्र तपासणी या अत्यंत महत्त्वाच्या वैद्यकीय चाचण्या पूर्णपणे मोफत केल्या जाणार आहेत. पत्रकारितेतील धकाधकीच्या आणि तणावपूर्ण जीवनशैलीचा विचार करून, ज्येष्ठ मानसोपचारतज्ज्ञ डॉ. श्रीकांत पाटणकर यांचे 'ताणतणाव व्यवस्थापन' या विषयावर विशेष मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित केले आहे. शिबिरात उपस्थित राहणाऱ्या सर्व मीडिया प्रतिनिधींसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. सर्व पत्रकार बंधू-भगिनींनी या आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक व गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉ. सूर्यप्रकाश राजेश कोठे यांनी केले आहे.



## महापौर कोंड्याल यांचा शहरातील नाल्यांवर फोकस

**सोलापूर, दि. ११ जुलै-**

पावसाळ्यात शहरात पाणी साचून नागरिकांना त्रास होऊ नये, यासाठी महापौर विनायक कोंड्याल यांनी नाला क्रमांक ४-अ, ४-ब, निरंजन नगर, वज्रेश्वरी नगर तसेच एमआयडीसी परिसरातील नाल्यांची प्रत्यक्ष पाहणी करून प्रशासनाला तातडीच्या उपाययोजना करण्याचे निर्देश दिले.

महापौर कोंड्याल यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून नाल्यांची सद्यस्थिती, पाण्याचा प्रवाह, गाळ साचलेली ठिकाणे तसेच पूरस्थिती टाळण्यासाठी सुरू असलेल्या कामांचा आढावा घेतला. या पाहणी दौऱ्यात सभागृहनेते नरेंद्र काळे, नगरसेवक सिद्धेश्वर कमटम, नगर अभियंता सारिका आकूलवार, गोकुळ चितारे, चंद्रकांत गुंडे, अभिषेक चिंता उपस्थित होते. ज्या ठिकाणी गाळ, कचरा किंवा अतिक्रमणामुळे पाण्याचा निचरा बाधित होत असल्याचे निदर्शनास आले, त्या ठिकाणी तातडीने साफसफाई करून आवश्यक कारवाई करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. पावसाळ्यात कोणत्याही भागात पाणी साचणार नाही, यासाठी नाल्यांची नियमित पाहणी करून पाणी निचऱ्याची व्यवस्था सुरळीत ठेवावी, असे निर्देशही त्यांनी संबंधित विभागाला दिले.

## 'एजी पाटील' च्या विद्यार्थ्यांची पर्यावरणपूरक किमया

### पावलांच्या ऊर्जेतून आता वीज निर्मिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जुलै-**

सोलापूर शहरातील ए. जी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या मेकॅनिकल इंजिनीअरिंग विभागातील विद्यार्थ्यांनी एक अभिनव आणि पर्यावरणपूरक प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण केला आहे. विद्यार्थ्यांच्या या चमूने मानवी पाऊलखुणांच्या मेकॅनिकल ऊर्जेचा वापर करून थेट वीज तयार करणारे स्मार्ट-स्टेप: कायनेटिक एनर्जी हार्वेस्टर यंत्र तयार केले आहे. या मशीनद्वारे दैनंदिन चालण्या-बोलण्यातून वाया जाणारी ऊर्जा साठवून ती वीज स्वरूपात वापरता येते, जी भविष्यातील ऊर्जा टंचाईवर एक उत्तम पर्याय ठरू शकते.



या प्रकल्पामध्ये बी.ई. अंतिम वर्षातील विद्यार्थी विजय बुरा, ओंकार ध्यामे, हर्ष बुरजे आणि हर्षद घोटणे यांनी सक्रिय सहभाग घेतला. त्यांच्या प्रकल्पाला प्रा. अभिजीत मळेकर यांचे तांत्रिक मार्गदर्शन लाभले, ज्यामुळे हा प्रयोग शास्त्रीय दृष्टिकोनातून अचूक रित्या पार पडला.

विद्यार्थ्यांनी या संपूर्ण यंत्राची रचना पायझोइलेक्ट्रिक मॅट्रिक्स वायरिंग आणि चाचण्या स्वतः पार पाडल्या, ज्यामुळे त्यांच्या व्यावसायिक व तांत्रिक कौशल्यात लक्षणीय वाढ झाली.

या उपक्रमास विभागप्रमुख डॉ. एस. बी.गदवाल आणि प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या संशोधनबद्दल संस्थेचे अध्यक्ष एस. ए. पाटील, सचिव एस. एस. पाटील, कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले, प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## प्रोएज कॉमर्स प्रोफेशनल अकॅडमीचे सीए फाउंडेशन परीक्षेत यश



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जुलै-**

एस.पी.एम. इंग्लिश स्कूल, सोलापूर यांच्या सहकार्याने सुरू झालेल्या प्रोएज कॉमर्स प्रोफेशनल अकॅडमीने आपल्या पहिल्याच शैक्षणिक वर्षात उल्लेखनीय यश संपादन करत सीए शिक्षण क्षेत्रात दमदार सुरुवात केली आहे.

मे २०२६ मध्ये झालेल्या सीए फाउंडेशन परीक्षेत अकॅडमीच्या पहिल्या बॅचमधील विद्यार्थ्यांनी उत्तम यश मिळवत संस्थेचा लौकिक वाढविला. यामध्ये खुशी नानकानी हिने २६७/४०० गुण मिळवत उत्कृष्ट यश संपादन केले. तसेच अलेख्या कंदुकुरी हिंने २३९/४००, अमानुल्ला सय्यद याने २२२/४०० आणि हमजा पटवेगर याने २०७/४०० गुण मिळवत सीए फाउंडेशन परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण केली. विद्यार्थ्यांचा सत्कार सीए राजेश पाटवर्धन, एस.पी.एम. शाळेचे स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य सुरेशबाबू मंकणी तसेच एस.पी.एम. इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या संगीता कोळी यांच्या हस्ते करण्यात आला. या यशामागे अकॅडमीच्या सीए तन्वी अत्रे, नंदिनी पवार, मोहम्मद सलाहुद्दीन, अंकिता मुर्त्या, अंजली भुतडा, शुभम चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले.



## ज्ञान प्रबोधिनी बालविकास मंदिर प्रशालेचा वर्धापन दिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जुलै-**

ज्ञान प्रबोधिनी बालविकास मंदिर प्रशालेचा ८१ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या समारंभाला बालविकास मंदिरचे माजी विद्यार्थी ॲड. नितीन हबीब हे प्रमुख पाहुणे लाभले होते.

प्रमुख पाहुणे, संस्थेचे सहकार्यवाह डॉ. अमोल गांगजी, प्रशालेचे विश्वस्त बसवराज बिराजदार, प्रशालेचे विश्वस्त व चैतन्यभुवनचे व्यवस्थापक श्रीरंग कुलकर्णी व मुख्याध्यापिका प्रवीणा काळे यांच्या हस्ते इ.५वी ते १०वी च्या १२३ विद्यार्थ्यांचा २७५ पारितोषिके देवून गौरव केला. या पारितोषिकात इयत्तांनुसार पहिले तीन, सर्व विषयात प्रथम, गुणवत्ता वाढ, क्रीडा, शाळाबाह्य स्पर्धा, वर्षभर उपस्थिती अशा विविध प्रकारच्या पारितोषिकांचा समावेश होता. प्रस्ताविक पर्यवेक्षिका उज्ज्वला अलकुंटे यांनी केले. समारोपात संस्थेचे सहकार्यवाह डॉ. अमोल गांगजी यांनी पारितोषिक प्राप्त सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

## जिल्हा वार्षिक आराखडा

### सोलापूरच्या विकासाला नवी दिशा देणारा महत्त्वाचा टप्पा

सोलापूर जिल्ह्याच्या विकासाचा वेग ठरवणाऱ्या जिल्हा वार्षिक आराखड्याची प्रक्रिया आता निर्णायक टप्प्यात आली आहे. २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण व अनुसूचित जाती उपयोजना) तयार करण्याचे काम वेगाने सुरू असून, जिल्हा नियोजन समिती (डीपीसी) बैठकीपूर्वी सर्व विभागांनी आपले प्रस्ताव अंतिम करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे जिल्हा परिषद आणि विविध विभागांमध्ये विकासकामांचे नियोजन, प्राधान्यक्रम आणि निधीची आखणी करण्यासाठी मोठी लगबग सुरू आहे.

जिल्हा वार्षिक आराखडा हा केवळ आर्थिक तरतुदींचा दस्तऐवज नसतो, तर पुढील वर्षभर जिल्ह्यात कोणत्या क्षेत्रात आणि कोणत्या कामांना प्राधान्य दिले जाणार, याचा आराखडा असतो. त्यामुळे या प्रक्रियेकडे प्रशासनाबरोबरच लोकप्रतिनिधी आणि सर्वसामान्य नागरिकांचेही लक्ष लागलेले असते. यंदाच्या आराखड्यात शिक्षण, सार्वजनिक बांधकाम, लघुपाटबंधारे, आरोग्य, सामान्य प्रशासन आणि पशुसंवर्धन या विभागांना विशेष प्राधान्य देण्यात येत आहे. ग्रामीण भागातील मूलभूत सुविधांचा दर्जा उंचावण्याचा प्रयत्न या नियोजनातून दिसून येत आहे.

शिक्षण क्षेत्रात शाळांची दुरुस्ती, नवीन वर्गखोल्या, विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सुविधा आणि शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी निधीची तरतूद प्रस्तावित आहे. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत ग्रामीण रस्ते, पूल आणि इतर पायाभूत सुविधा मजबूत करण्याचे नियोजन आहे. लघुपाटबंधारे विभागाकडून सिंचन क्षमता वाढविणाऱ्या योजना राबविण्यावर भर दिला जाणार आहे. आरोग्य विभागामार्फत प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, वैद्यकीय उपकरणे आणि आरोग्य सेवांचा दर्जा सुधारण्यासाठी निधीची मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय महिला व बालविकास, समाजकल्याण, कृषी, ग्रामीण पाणीपुरवठा आणि पशुसंवर्धन या विभागांच्याही विविध योजनांचा आराखड्यात समावेश करण्यात येत आहे. ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या योजना, शेतकऱ्यांसाठी सुविधा, महिला व बालकल्याणाच्या योजना आणि पशुधन विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे विकासाचा लाभ केवळ एका क्षेत्रापुरता मर्यादित न राहता सर्व घटकांपर्यंत पोहोचावा, हा उद्देश या नियोजनामागे दिसून येतो. मात्र, जिल्हा वार्षिक आराखड्यासमोरील सर्वात मोठे आव्हान म्हणजे प्रस्तावित आणि मंजूर निधीतील तफावत. दरवर्षी विभागांकडून मोठ्या प्रमाणात निधीची मागणी केली जाते; परंतु प्रत्यक्ष मंजुरी त्यापेक्षा कमी मिळते. परिणामी अनेक विकासकामांना टप्प्याटप्प्याने मंजुरी द्यावी लागते किंवा काही कामे पुढे ढकलावी लागतात. त्यामुळे यंदा अधिकाधिक निधी मंजूर करून घेण्यासाठी प्रशासनाला प्रभावी पाठपुरावा करावा लागणार आहे.

गेल्या काही वर्षांत जिल्हा वार्षिक आराखड्याच्या आकारात सातत्याने वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. यंदाही निधीत वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. जर प्रस्तावित वाढीला मंजुरी मिळाली, तर जिल्ह्यातील अनेक प्रलंबित विकासकामांना गती मिळू शकते. विशेषतः ग्रामीण रस्ते, शाळांच्या इमारती, आरोग्य सुविधा, सिंचन प्रकल्प आणि पाणीपुरवठा योजनांना याचा मोठा फायदा होईल.

**जिल्हा परिषदेतून**



**यशवंत गुरव**
**मो. ८८८८६५०७५५**

जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी नियोजनबद्ध खर्च करणे ही काळाची गरज आहे. उपलब्ध निधीचा उपयोग केवळ नवीन कामांसाठीच नव्हे, तर सुरू असलेली कामे वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यासाठीही होणे आवश्यक आहे. विकासकामांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता, गुणवत्तेवर भर आणि वेळेचे नियोजन राखले, तर निधीचा प्रत्यक्ष लाभ नागरिकांपर्यंत पोहोचू शकतो. आता सर्वांचे लक्ष आगामी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीकडे लागले आहे. या बैठकीत अंतिम आराखड्याला मंजुरी मिळाल्यानंतर विभागनिहाय निधी निश्चित होईल आणि विकासकामांना प्रत्यक्ष सुरुवात होईल.

त्यामुळे २०२६-२७ चा जिल्हा वार्षिक आराखडा हा सोलापूर जिल्ह्याच्या विकासाची पुढील दिशा ठरवणारा महत्त्वाचा दस्तऐवज ठरणार आहे.एकंदरीत, शिक्षण, आरोग्य, रस्ते, सिंचन, पाणीपुरवठा, कृषी आणि सामाजिक विकास या सर्व क्षेत्रांना बळ देणारा हा आराखडा प्रभावीपणे राबविला गेला, तर ग्रामीण भागातील नागरिकांच्या जीवनमानात निश्चितच सकारात्मक बदल घडू शकतो. त्यामुळे केवळ निधी मंजूर होणे पुरेसे नसून, त्याची वेळेत आणि नियोजनबद्ध अंमलबजावणी होणे हेच खऱ्या अर्थाने जिल्ह्याच्या विकासाचे यश ठरणार आहे.